



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे * अंक १०६ * नांदेड * मंगळवार, दि. २२ एप्रिल २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# पुन्हा अतिमुसळधार पावसाचा इशारा; १७ राज्यांना आयएमडीचा हायअलर्ट

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशभरात पुन्हा एकदा अचानक वातावरणात मोठा बदल झाल्याचं पाहायला मिळत आहे. उत्तर भारतासह देशातील अनेक भागां मध्ये सायक्लोनिक सर्कुलेशन तयार झालं आहे. ज्यामुळे पुन्हा एकदा वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाकडून देशातील जवळपास १७ राज्यांमध्ये पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. या राज्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, काही ठिकाणी गारपिटीसह पावसाची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.



हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये बर्फवृष्टीसोबतच मुसळधार पावसाची शक्यता आहे. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड मध्ये देखील पुढील दोन दिवस जोरदार पावसाची शक्यता असून, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पाऊस पडू शकतो, असं हवामान विभागानं म्हटलं आहे. या काळात या भागांमध्ये प्रतितास ६० किमी वेगानं वारं वाहण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये देखील ढगाळ वातावरण राहणार असून, या राज्यांमध्ये देखील पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. दिल्लीमध्ये ढगाळ वातावरण राहील मात्र पावसाची शक्यता नाही.

पूर्व भारतामध्ये देखील हवामान विभागाकडून पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पुढील पाच दिवस पूर्व भारतामध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, आणि त्रिपुरामध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. २२ एप्रिलरोजी अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दक्षिण भारतामध्ये देखील पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, तेलंगाणा आणि तामिळनाडूमध्ये जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

दुसरीकडे मात्र महाराष्ट्रात उष्णतेची लाट पाहायला मिळणार आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांचं तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षाही अधिक आहे. विदर्भात पारा चांगलाच वाढला असून, चंद्रपुरात सर्वाधिक तापमानाची नोंद झाली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात तापमान ४५.६ अंश सेल्सिअसवर पोहोचलं आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

# एक तोळा सोन्याची किंमत पोहचली लाखाच्या पार

**मुंबई (प्रतिनिधी)–** एकीकडे उन्हाचा तडाखा वाढत असताना आता सोन्याच्या भावाने अखेर लाखाची वेस ओलांडली आहे. कमजोर झालेला डॉलर आणि अमेरिका-चीन व्यापार युद्ध यावरुन अनिश्चितचेचे वातावरणाच्या पार्श्वभूमीवर आता चलन वाढ झाल्याने देशाची राजधानी दिल्लीत सोमवारी सोन्याच्या भावाने एक लाख रुपयांच्या आकड्याला पार केले आहे. सोन्याचे भाव दहा ग्रॅमला १,६५० रुपयांनी वाढ झाली होती. अखिल भारतीय सराफ संघाने दिलेल्या माहीतीनुसार सोन्याच्या किंमती मोठी वाढ झाली आहे. देशाची राजधानी दिल्लीत एका तोळ्याचे सोन्याचे भाव एक लाखाच्याही पार गेले आहेत. राजधानी दिल्लीत सोन्याचे भाव अखेर एका तोळ्याला एका लाखाच्या पुढे गेले आहेत. दिल्ली सराफा बाजारात २१ एप्रिल २०२५ सायंकाळी ६.२८ वाजेपर्यंत १० ग्रॅम सोन्याचा भाव अखेर १ लाख २५० रुपयांच्या पुढे पोहचला आहे.

९९.९ टक्के सोन्याचे दर सोमवारी आधी ९९,८०० रुपये प्रती १० ग्रॅम (एक तोळा) पोहचले होते. शुक्रवारी यात थोडी घसरण होऊन २० रुपयांनी दर घसरुन ९८,१५० रुपये प्रति १० ग्रॅम पर्यंत पोहचले होते. सोमवारी सायंकाळी तर अचानक सोन्याच्या दरात उसळी आली आणि सोन्याचे दर एक लाखाच्याही पार गेल्याचे अखिल भारतीय सराफ संघाने म्हटले आहे.

सोमवारी स्थानिक बाजारात ९९.५ शुद्ध सोन्याचा दर १,६०० रुपयांनी उसळून ९९,३०० रुपये प्रति १० ग्रॅम (एक तोळा) या नव्या उच्चांकावर पोहचला आहे. गेल्या कामकाज सत्रात यात किरकोळ घसरण होऊन भाव ९७,७०० रुपये प्रति १० ग्रॅमवर बंद झाला होता.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून येणारे प्रस्ताव आरोप करणाऱ्या आमदारांनी तपासावे -पालकमंत्री अतुल सावे

**नांदेड (प्रतिनिधी)–** तांडा-वस्ती सुधार योजनेचे सव्वा सात कोटी रुपयांचे काम पालकमंत्र्यांनी रद्द केल्याचा दावा महायुतीतील भाजप, शिवसेनेच्या आमदारांनी करून पालकमंत्र्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केला होता. या दोन्ही आमदारांच्या आरोपाला पालकमंत्री अतुल सावे यांनी जोरदार प्रत्युत्तर देत जिल्हाधिकाऱ्यांकडून येणारा प्रस्ताव संबंधित आमदारांनी वाचला पाहिजे, असा सल्लाही त्यांनी दिला. सोमवारी पालकमंत्री अतुल सावे नांदेड दौऱ्यावर आले असता ते बोलत होते.



जिल्ह्यातील मुखेडचे भाजप आ. डॉ. तुषार राठोड यांनी तांडा-वस्ती सुधार योजनेसाठी मंजूर झालेला निधी पालकमंत्री यांनी रद्द केला. जिल्ह्याचे पालकमंत्री सत्तेतील आमदारांना कुठल्याही कामात विश्वासात घेत नाहीत. विकास कामात अडथळा निर्माण करतात असा आरोप त्यांनी केला होता. एवढेच नाही तर त्यांची तक्रार थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनीही या प्रकरणात दखल घेत पालकमंत्र्यांना सूचना केल्या होत्या. तर तिकडे शिवसेनेतून पहिल्यांदाच आमदार झालेले हदगाव विधानसभा मतदारसंघाचे बाबुराव पाटील कोहळीकर यांनीही पालकमंत्र्यांच्या कामकाजाबद्दल संताप व्यक्त केला होता. पालकमंत्री स्थानिक आमदारांना विश्वासात घेत नाहीत असा सवालही त्यांनी उपस्थित केला होता. दोन्ही आमदारांच्या वक्तव्या मुळे नांदेड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती.

सोमवारी जिल्ह्याचे पालकमंत्री नांदेड जिल्हा दौऱ्यावर आल्यानंतर सकाळी शासकीय विश्रामगृहात पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, स्थानिक आमदारांनी केलेला आरोप हा तथ्यहीन असून माझ्याकडे मंजुरीसाठी येणारा प्रस्ताव हा जिल्हाधिकाऱ्यांमार्फत येतो. आमदारांचा काही संबंध येत नाही. परंतु मंजुरीसाठी येणारा प्रस्ताव संबंधित आमदारांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे जाऊन पाहिला पाहिजेत. आपल्या मतदारसंघासाठी काय दिले? काय नाही? त्याची खात्री केली पाहिजे. एवढेच नाही तर आ. डॉ. तुषार राठोड यांच्या मतदारसंघाला मी स्वतः १ कोटी ९० लाख रुपयांचा निधी मंजूर केला, तो त्यांनी अगोदर मान्य करावा. बिनबुडाचे आरोप करू नये, असेही ते म्हणाले. जिल्ह्याचा पालक या नात्याने विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून देण्यासाठी मी कटीबद्ध असून संबंधित आमदारांनीही त्याचा योग्य विनियोग करून मतदारसंघाचा विकास कसा होईल, याकडे लक्ष द्यावे अशा कान पिचक्याही त्यांनी दिल्या. सत्तेतील आमदारांनी जर अशी वर्तणूक ठेवली तर विरोधी पक्षाच्या आमदारांना ते आयते कोलीत ठरेल असेही पालकमंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

तसेच शहर व जिल्ह्यातील सर्व प्रमुख अधिकाऱ्यांसोबत विविध विषयावर आढावा बैठक घेण्यात आली. पाणीपुरवठा, शिक्षण तसेच महानगरपालिका, जिल्हा परिषदअंतर्गत, पोलीस विभागाचे काही प्रलंबित प्रश्न आहेत. ते येणाऱ्या काळात मार्गी कसे लावता येतील व त्याला डीपीडीसीतून निधी कसा उभारता येईल याबाबत सविस्तर चर्चा झाली. पुढच्या भेटीमध्ये सर्वच लोकप्रतिनिधी आणि सर्व अधिकारी यांची एक एकत्र बैठक घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तांडा -वस्तीचा विषय हा स्थानिक आमदारांनी अभ्यास केल्यानंतर बोलावयास हवा होता. परंतु आमच्याकडे सध्या २३७ आमदारांचे बळ असल्याने युतीवर टीका करणाऱ्यांनी एकतर बाहेर जावे असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे एकत्र येत असतील तर तो त्यांचा कौटुंबिक प्रश्न आहे, आम्हाला त्याचा आनंदात असणार आहे, असेही पालकमंत्री सावे यांनी सांगितले. यावेळी खा. अजित गोपछडे, जिल्हाध्यक्ष अॅड. किशोर देशमुख यांच्यासह भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# राज्यात आणखी एकाचा उष्माघाताने मृत्यू

**बुलढाणा (प्रतिनिधी)–** बुलढाण्यात एसटीच्या वाहकाचा मृत्यू झाला आहे. या वाहकाचा मृत्यू हा उष्माघातानं झाला असावा असा प्राथमिक अंदाज आहे. संजय भगवान मोरे वय ३० वर्ष असं या मृत वाहकांचं नाव आहे. ते चिखली डेपोमध्ये कार्यरत होते.

राज्यात उन्हाचा कडाका चांगलाच वाढला आहे. विदर्भात तर उष्णतेची लाट पाहायला मिळत आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. चंद्रपूरमध्ये सर्वाधिक तापमानाची नोंद झाली असून, जिल्ह्यात पारा ४५. ६ अंश सेल्सिअसवर पोहोचला आहे. तर ब्रम्हपुरीमध्ये ४५ अंश सेल्सिअस एवढं तापमान नोंदवण्यात आलं आहे. वाढत्या उष्णतेमुळे रस्त्यावर देखील शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

संजय भगवान मोरे वय ३० हे चिखली डेपोमध्ये कार्यरत होते. ते रविवारी बुऱ्हाणपूर येथून बस घेऊन आले होते. त्यांना पुन्हा एकदा ड्युटीवर जायचे होते. मात्र त्याचपूर्वी त्यांना त्रास जाणवू लागला. त्यांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं, मात्र डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केलं.

# इकडं ठाकरे बंधूंच्या युतीच्या चर्चा, तिकडे शरद पवार-अजितदादा पवारांमध्ये बैठकांचा धडाका, काका-पुतण्यात मनोमिलन होणार?

**पुणे (प्रतिनिधी)–** पुण्यातील साखर संकुलात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात महत्त्वाची बैठका झाल्याची माहिती मिळत आहे. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या कामकाजासंबंधी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे अधिकारी देखील उपस्थित होते. साखर संकुलातील बैठकीनंतर शरद पवार आणि अजित पवार यांच्यात वेगळी बैठक देखील झाली. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

सोमवारी सकाळी सर्वात आधी एआय तंत्रज्ञानाचा कृषी क्षेत्रात कसा वापर करावा?



या संबंधित बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यानंतर वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या कामकाजासंदर्भात काही अधिकाऱ्यांसोबत चर्चा झाली. यानंतर शरद पवार आणि अजित पवार यांच्यात वेगळी महत्त्वाची बैठक झाल्याची माहिती समोर येत आहे.

वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूटच्या बैठकीला अजित पवार हे उपस्थित राहत नव्हते. मात्र मागील बैठकीला अजित पवार हे बैठकीला आले आणि त्यांनी शरद पवार यांच्यासोबत बैठकीत चर्चा देखील केली होती. त्यानंतर सातारा येथे रयत शिक्षण संस्थेच्या बैठकीत अध्यक्ष म्हणून शरद पवार उपस्थित होते. तर कार्यकारी मंडळावर अजित पवार असल्याने ते देखील त्या बैठकीला उपस्थित होते. आता पुन्हा अजित पवार आणि शरद पवार हे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या बैठकीला एकत्र उपस्थित राहिले आहे. अजित पवार आणि शरद पवार यांच्या एक वेगळी बैठक देखील सुरू आहे. तसेच गेल्या काही दिवसांपासून अजित पवार यांनी भाषणात बोलताना काकांचा आशीर्वाद घ्यावा लागतो, असे वक्तव्य केले होते.

# प्रा. डॉ. दीपक शिंदे यांची केंद्रीय विद्यापीठात परीक्षा नियंत्रक म्हणून निवड

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माध्यम शास्त्र संकुलाचे प्राध्यापक व माजी संचालक डॉ. दीपक मोहनराव शिंदे यांची केंद्रीय जनजाती विद्यापीठ विशाखापट्टणम (विजयानगरम) येथे परीक्षा नियंत्रक म्हणून निवड झाली आहे. या त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



नांदेड येथील महात्मा गांधी मिशन पत्रकारिता महाविद्यालयाची स्थापना डॉ. दीपक शिंदे यांनी माजी मंत्री कमलकिशोर कदम यांच्या मार्गदर्शना खाली केली. त्यानंतर त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात पत्रकारिता विभागाचे संचालक म्हणून १४ वर्षे काम केले. या काळात त्यांनी विद्यापीठात अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक मीडिया स्टुडिओ उभा केला. मीडिया विभाग स्वतंत्र इमारतीत स्थलांतरित करण्यात डॉ. शिंदे यांचा मोठा वाटा आहे. विद्यापीठातील श्री गुरुगोविंद सिंघजी अध्यासन संकुल सुरू करून या संकुलासाठी केंद्र शासनाकडून २५ कोटी रुपयांचा निधी मिळवून देण्यात डॉ. शिंदे यांनी मोठे योगदान दिले आहे. दै. प्रजावाणी, दै. लोकपत्र, दै. नागपूर पत्रिका या दैनिकांतून प्रारंभीच्या काळात त्यांनी काम केले आहे. **(पान ६ वर...)**

# अभय कुरुंदकरला जन्मठेप, अश्विनी बिद्रे हत्याकांडप्रकरणाचा निकाल

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यभर खळबळ उडवणाऱ्या अश्विनी बिद्रे हत्याकांडाचा निकाल अखेर लागला आहे. मुख्य आरोपी अभय कुरुंदकर याला जन्मठेप आणि २० हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे. ही हत्या अत्यंत क्रूर पद्धतीने करण्यात आली होती, अशी गंभीर टिपणी करत न्यायालयाने ही शिक्षा दिली. या प्रकरणातील सहआरोपी महेश फळणीकर आणि कुंदन भंडारी यांना ७ वर्षांच्या शिक्षा सुनावण्यात आल्या आहेत.

२०१५ साली नवी मुंबईतील सहायक पोलीस निरीक्षक अश्विनी बिद्रे या महिला अधिकाऱ्याचा गूढ मृत्यू समोर आला होता. ती अचानक बेपत्ता झाली आणि अनेक दिवसांनंतर तिचा तपास सुरू झाला. तपासात समोर आले की, तिची क्रूर पद्धतीने हत्या करून मृतदेहाचा पुरावा नष्ट करण्यात आला होता. मुख्य आरोपी अभय कुरुंदकर हा खुद्द पोलीस दलात कार्यरत असलेला अधिकारी होता. त्याच्यावर अश्विनीसोबत संबंध होते, मात्र त्यातून निर्माण झालेला संघर्ष आणि दबाव यामुळे त्याने तिची हत्या केल्याचं आरोपपत्रात नमूद करण्यात आलं होतं.

# इंग्लंडविरुद्धच्या सीरिजमध्ये रोहित शर्माच कर्णधार

**मुंबई (प्रतिनिधी)–** बीसीसीआयने अखेर केंद्रीय करार जाहीर केला. याची बऱ्याच दिवसांपासून वाट पाहिली जात होती, पण उशिरा का होईना, आता ही घोषणा करण्यात आली आहे. दरम्यान, बीसीसीआयने पुन्हा चार भारतीय खेळाडूंना ए प्लस ग्रेडमध्ये स्थान दिले आहे. यामध्ये रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा यांची नावे आहेत. बीसीसीआयच्या या घोषणेनंतर, आता हे निश्चित झाले आहे की रोहित शर्मा सध्या कुठेही जाणार नाही.

गेल्या वर्षी जेव्हा भारतीय क्रिकेट संघ पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाला गेला होता, तेव्हा रोहित शर्मा त्याच्या फॉर्मशी संघर्ष करत असल्याचे दिसून आले. त्या मालिकेत संघाची कामगिरीही फारशी खास नव्हती. परिस्थिती इतकी टोकाला पोहोचली होती की रोहित शर्माला शेवटच्या कसोटीच्या अंतिम अकरामधून स्वतःला वगळावे लागले.

यानंतर, रोहित शर्मा आता कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होणार असल्याची अटकळ सुरू झाली. त्याने आधीच टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. पण आता बीसीसीआयने केलेल्या घोषणेवरून असे वाटत नाही की रोहित शर्मा कुठेही जात आहे.

जूनमध्ये जेव्हा टीम इंडिया पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी इंग्लंडला जाईल, तेव्हा रोहित शर्मा संघाचे नेतृत्वही करताना दिसु शकतो. मात्र, अद्याप संघाची घोषणा झालेली नाही.

असे बोलले जाते की, केंद्रीय कराराची घोषणा करण्यापूर्वी बीसीसीआयच्या उच्च अधिकाऱ्यांनी रोहित शर्माशी चर्चा केली असले आणि त्याच्या भविष्यातील योजना जाणून घेतल्या असतील. त्यानंतरच त्याला ए प्लस ग्रेड देण्यात आला. जर रोहित कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा विचार करत असता, तर त्याला किमान प्लस ग्रेडमध्ये जागी मिळाली नसती.

# कोब्रा कंमाडोंकडून ८ नक्षलवाद्यांचा खात्मा, १ कोटी बक्षीस असलेला विवेक ठार

**धनबाद (प्रतिनिधी)–** झारखंड राज्यातील बोकारो जिल्ह्यातील लुगू पहाडी प्रदेशात सुरक्षारक्षक आणि नक्षलवाद्यांच्या चकमकीत ८ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. त्यामध्ये, नलक्षी चळवळीचा म्होरक्या आणि १ कोटी रुपयांचे पारितोषिक असलेल्या भाकपा माओदी केंद्रीय कमिटीचा सदस्य मांझी उर्फ विवेक दा याचाही खात्मा करण्यात आला आहे. मांझीला ठार केल्याने नक्षलवादी चळवळीच्या एका युगाचा अंत झाल्याचे बोलले जाते. रविवारी रात्री पोलिसांना नलक्षवाद्यांसंदर्भात खबऱ्याकडून माहिती मिळाली होती. त्यानुसार, सुरक्षा जवानांनी संबंधित परिसरात कोंम्बिंग ऑपरेशन राबवून ८ नलक्षवाद्यांना कंठस्नान घातले.

झारखंडच्या बोकोरा जिल्ह्यात सोमवारी सकाळी नक्षलवादी आणि पोलिसांमध्ये चकमक झाली. त्यात, ८ नक्षलवादी ठार झाले असून एक कोटी रुपयांचा इनामी नक्षलवादी नेता विवेक याचाही खात्मा करण्यात आला आहे. ललपनिया परिसरातील लुगू टेकड्या, बोकारो जिल्हा या ठिकाणी ही चकमक झाली. सकाळी ६ वाजल्यापासून पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये ही चकमक सुरू होती. सीआरपीएफचे कोब्रा कमांडो आणि झारखंड पोलिसांच्या संयुक्त पथकाने केलेल्या कारवाई ८ नक्षलवाद्यांना ठार करण्यात यश आले. त्यामध्ये, विवेक दा खात्मा हा सुरक्षा रक्षकांच्या कारवाईचं मोठं यश मानलं जात आहे. सुरक्षा जवानांच्या चकमकीत कुख्यात नक्षलवादी प्रयाग मांझी ठार झाला असून काही फरार झालेल्या नक्षलवाद्यांसाठी देखील शोध मोहिम सुरु करण्यात आली आहे.

विवेक दा हा धनबाद जिल्ह्याच्या टुंडी येथील मानियाडेहचा मूळ रहिवासी होता. कमी वयातच त्याने नक्षल चळवळीत पदार्पण केलं होतं. त्यामुळे, आयुष्यातील मोठा काळ त्याने नक्षलवाद्यांचे नेतृत्व केलं आहे. केवळ झारखंडच नाही, तर बिहार, ओडिशा आणि छत्तीसगढच्या नक्षल चळवळीत तो सक्रीय होता. बोकारो जिल्ह्यात त्याचा मोठा प्रभाव होता. गिरीडीह येथील क्षेत्रात त्याच्या एकट्यावर ५० पेक्षा जास्त गुन्हे दाखल होते. नक्षल चळवळीत तो एक रणनीतीकार शस्त्रप्रमुख म्हणून कार्यरत होता.

# जलसंधारण व टंचाई निवारण्याच्या कामाला प्राधान्य देण्याचे आदेश

## टंचाई व नियोजनसंदर्भात पालकमंत्री अतुल सावे यांची आढावा बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी सोमवारी आपल्या एक दिवसीय दौऱ्यामध्ये विविध विभागाच्या आढावा बैठकी घेतल्या. जिल्ह्यातील टंचाई परिस्थितीची माहिती घेतली. तसेच जिल्हा नियोजनच्या आराखड्यावरही संबंधित यंत्रणेची चर्चा केली.

पालकमंत्री अतुल सावे यांचे शासकीय विश्रामगृह येथे सोमवारी सकाळी १० वाजता आगमन झाले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी त्यांचे स्वागत केले.

विश्रामगृहात त्यांच्या भेटीला यावेळी खासदार डॉ.अजित गोपछेडे, आ.राजेश पवार हे देखील आले होते. याशिवाय विविध पदाधिकाऱ्यांनी देखील त्यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली.



दुपारी पालकमंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत शासकीय विश्रामगृह नांदेड येथे विविध विभागांच्या बैठकांना सुरुवात झाली. उन्हाळ्याच्या दिवसातील विविध विभागांकडून होणारी टंचाई निवारण व जलसंधारणाच्या कामाला गती देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तसेच जिल्हा नियोजन समितीचे आराखडे देताना अभ्यासपूर्ण व नाविन्यपूर्ण आराखडे सादर करण्याबाबत तयारीला लागण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

सोमवारी सर्वप्रथम पोलीस प्रशासन व महानगरपालिका प्रशासन यांच्यासोबत बैठक घेण्यात आली. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, तसेच महानगरपालिका आयुक्त डॉ.महेश डोईफोडे यांची यावेळी उपस्थिती होती.

शहरातील समस्यांसंदर्भात व विविध प्रलंबित विषयांचा आढावा पालकमंत्र्यांनी घेतला. विशेषत: शहरातील वाहतूक, स्वच्छता, रस्ते यासंदर्भात लोकप्रतिनिधींकडून आलेल्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितल्या. शहरांमधील वाहतूक अधिक चांगली करण्याबाबतचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, यांच्यासोबत दुसरी बैठक घेण्यात आली. यामध्ये जिल्ह्यातील पाणीपुरवठा, पाणीटंचाई, चारा टंचाई, याबाबतचे आगामी काळातील नियोजनाचा आढावा घेण्यात आला. याशिवाय जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, आदी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच जिल्हा नियोजन समितीमधून नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच अन्य बाबींचे काटेकोर नियोजन करण्याची यावेळी पालकमंत्र्यांनी सूचना केली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# सक्तीची हिंदी म्हणजेच मराठीचा अपमान?

महाराष्ट्रात शालेय वर्गांपासून हिंदी शिकविण्याचा अट्टाहास केंद्राकडून केला जातो आहे. पण राज्यकर्त्यांनी इतकं तरी लक्षात घ्यावं की, 'मराठीची वाढ' ही केवळ घोषणांमधून नव्हे, तर धोरणांमधून होते अन्यथा, उद्याच्या महाराष्ट्रात मराठी भाषेची घसरण सुरूच राहील आणि त्याचे दायित्व मग आजचा निर्णय घेणाऱ्यांवरच जाईल. महाराष्ट्रात आधीच हिंदी भाषेचे प्राबल्य वाढले आहे. मुंबई, नागपूर, पुणे, संभाजीनगर अशा अनेक शहरांमध्ये हिंदी भाषिक लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, स्थानिक मराठी भाषकांचा आवाज झाकोळला जातो आहे. अशा वेळी राज्य शासनाने शालेय शिक्षणात हिंदीची सक्ती करणे म्हणजे मराठी भाषेला दुय्यम स्थान देण्याचा प्रयत्न आहे, असा स्पष्ट संदेश जातो. हे चित्र अतिशयोक्त नाही. कारण जेव्हा फेरीवाले मराठी भाषिक असल्यामुळे हाकलले जातात, सोसायट्यांमध्ये मराठी लोकांना घर देण्यास नकार दिला जातो, कार्यालयात मराठी बोलण्यास मज्जाव होतो तेव्हा हे प्रश्न केवळ भाषिक नसून सामाजिकही बनतात. शिक्षण विभागाचा दावा आहे की, हिंदीची सक्ती म्हणजे मराठीचा अपमान नाही. उलट, हिंदी पाठ्यपुस्तकांतील अक्षरगट मराठीप्रमाणे तयार करण्यात येणार आहेत, असा युक्तिवाद एससीईआरटीचे संचालक करतात. मात्र या युक्तिवादाला वास्तवाचा आधार नाही. कारण, मुद्दा अक्षरगटांचा नव्हे मुद्दा आहे सक्तीचा. विद्यार्थ्यांवर पहिलीपासून तीन भाषा लादल्यास त्यांच्या बौद्धिक आणि भाषिक विकासावर परिणाम होतो. आजपर्यंत हिंदी शिकवली जात होतीच पाचवीपासून, आणि आठवीपासून संस्कृत व परकीय भाषा निवडण्याचाही पर्याय होता. मग ही नव्या सक्तीची गरज का? केंद्र शासनाच्या धोरणानुसार आता पहिलीपासूनच मराठी आणि इंग्रजीसोबत हिंदी भाषेची सक्ती करण्यात येणार आहे. ही सक्ती केवळ शिक्षण धोरणाचा भाग नसून, त्यामागे असलेली प्रवृत्ती ही चिंताजनक आहे महाराष्ट्राच्या भूमीत मराठी भाषेला गालबोट लावण्याचा हा प्रकार नाही का? देशात 'एक भाषा, एक राष्ट्र' या संकल्पनेच्या आधारावर शिक्षण प्रणाली रचण्याचा प्रयत्न होत आहे, हे उघड आहे. पण भारताचा खरा आत्मा त्याच्या भाषिक, सांस्कृतिक विविधतेत आहे. देशाच्या एकतेसाठी संपर्कभाषा आवश्यक आहे, हे मान्य. पण संपर्कासाठी हिंदीच हवी, असा आग्रह धोकादायक आहे. देशातील दक्षिणी राज्ये, जसे की केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, ही आपल्या भाषिक अस्मितेप्रती जागरूक आहेत. तिथे स्थानिक भाषा हेच व्यवहाराचे माध्यम आहेत. मग महाराष्ट्रातच का ही उदासीनता? मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असूनही, तिथे मराठीचा श्वास गुदमरतोय. सार्वजनिक पाट्यांपासून ते दैनंदिन व्यवहारांपर्यंत हिंदीचे प्राबल्य वाढते आहे, आणि आता शिक्षणातही तीच भाषा थेट पहिलीपासून लादली जात असेल, तर मराठीची पुढची पिढी तिला केवळ 'घरातील भाषा' म्हणून ओळखेल. भाषेचा समाजातील सन्मान शाळेपासूनच निर्माण होतो. जर त्या शाळेतच मराठीला दुय्यम स्थान असेल, तर मग आपण मराठीचा अभिमान का बाळगायचा? कोणी म्हणेल की, असे असेल तर इंग्रजी शाळेमधून का शिकविले जाते? त्याचे उत्तर असे आहे की, इंग्रजी शिकण्याची गरज वेगळी आहे. ती जागतिक व्यवहाराची भाषा आहे. गरीब-श्रीमंत सगळ्यांनीच ती शिकावी, हे सुसंगत आहे. पण हिंदी ही अशी गरज नसून, ती राजकीय दृष्टिकोनातून लादली जात आहे. मातृभाषेतून शिक्षण हे बालमानसशास्त्राच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे. यावर जागतिक तज्ज्ञांचे एकमत आहे. मग अशा वेळी तृतीय भाषा म्हणून सक्तीने हिंदी शिकवणे ही शिक्षणशास्त्राच्या विरोधात जाणारी बाब आहे. महाराष्ट्रात अनेक वर्षे 'मराठी भाषेचा अभिमान' ही संकल्पना रूजवली गेली. पण आज तीच भाषा उपेक्षित होत आहे. संस्कृतप्रमाणे मराठीही केवळ ग्रंथापुरती उरू नये, यासाठी आज कृतीची गरज आहे. शासनाने, पालकांनी आणि शिक्षकांनी या निर्णयाच्या विरोधात ठामपणे भूमिका घ्यायला हवी. शिक्षण क्षेत्रात भाषेचा प्रश्न केवळ अभ्यासक्रमाचा नव्हे तर समाजघटनाचा, अस्मितेचा आणि भविष्यातील पिढ्यांच्या विचारविश्वाचा आहे.

# पृथ्वी आहे, म्हणूनच रे माणसा, तुझे अस्तित्व!

मानवाला सुखाने जगायचे व आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर पृथ्वीचा समतोल राखता आला व पृथ्वीला तिच्या महाविनाशापासून वाचविता आले पाहिजे. तिचा समतोल राखण्यासाठी मानवाने वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि वृक्षतोड कमी करणे, प्राणी व पक्षी यांचे कमी होणारे प्रमाण वाढवणे, नद्यांचे जल स्वच्छ ठेवणे, आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे, शेतीत जैविक खतांचा वापर करणे, रासायनिक खते कमी वापरणे यांकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे.

वसुंधरा किंवा पृथ्वी दिन हा पृथ्वीच्या पर्यावरण संवर्धन जागृती करण्यासाठी जगभर पाळण्यात येतो. आपली पृथ्वी ही सुमारे ४.५० अब्ज वर्षांपूर्वी तयार झाली. अमेरिकेत २२ एप्रिल रोजी हा दिन पाळला जातो, तर संयुक्त राष्ट्रे २० मार्च रोजी, म्हणजे सूर्य पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या थेट समोर असण्याच्या दोन बिंदूपैकी एका बिंदूशी पोचण्याच्या दिवशी- संपातबिंदू होतो, तोच पृथ्वी दिन पाळतात. महाभारतामध्ये भारताच्या वर्णना-प्रमाणेच जगातील अन्य भौगोलिक स्थळांचे वर्णन आढळते. उदा. मंगोलियाचे गोबी वाळवंट, इजिप्तची नाईल नदी, लाल समुद्र इत्यादी इत्यादी. तसेच महाभारतातल्या भीष्म पर्वातील जम्बुखंड- विनिमर्ण पर्वात संपूर्ण पृथ्वीचे मानचित्र सांगितले आहे. ते असे-

सुदर्शनं प्रवक्ष्यामि द्वीपं तु कुरुनन्दन।
परिमण्डलो महाराज द्वीपोसौ चक्रसंस्थितः।।
यथाहि पुरुषः पश्येदादर्शे मुखमात्मनः।
एवं सुदर्शनद्वीपो दृश्यते चन्द्रमण्डले।।
द्विरंशे पिप्पलस्तत्र द्विरंशेच शशो महान्।।

याचा अर्थ- हे कुरुनन्दन! सुदर्शन नावाचे हे द्वीप चक्राप्रमाणे गोलाकार स्थित आहे. ज्याप्रमाणे पुरुष आरशात आपला चेहरा बघतो, त्याचप्रमाणे हे द्वीप चंद्रावरती दिसते. याच्यातील दोन अंशांमध्ये पिंपळाची पाने आणि दोन अंशांमध्ये मोठा ससा दिसतो.

पृथ्वी दिनासाठी जॉन मक्डॉनेल याने बनवलेला अनधिकृत ध्वज पर्यावरण रक्षणाची शिकवण



देण्याच्या हेतूने फडकविला जातो. अमेरिकेचा सिनेटर गेलॉर्ड नेल्सन याने २२ एप्रिल १९७० रोजी पहिल्यांदा पृथ्वी दिनाचे आयोजन केले. पहिला पृथ्वी दिन अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे पाळला गेला. तरीही त्या कार्यक्रमाचे राष्ट्रीय समन्वयक असलेले डेनिस हेस यांनी स्थापलेल्या संस्थेने इ.स. १९९० साली १४१ देशांमध्ये या दिवसाचे आयोजन केले व पृथ्वी दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला. सद्या अर्थ डे नेटवर्क या संस्थेच्या समन्वयाने १७५ देशांमधून हा दिवस साजरा केला जातो. इ.स. २००९ साली संयुक्त राष्ट्रांनी २२ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय धरणीमाता दिन म्हणून पाळण्याची घोषणा केली. पृथ्वी हा सूर्यमालेतील सूर्यापासूनच्या अंतरानुक्रमे तिसरा तर आकारानुक्रमे पाचवा ग्रह आहे. सूर्यमालेतील खडकाळ ग्रहांमध्ये हा सर्वांत मोठा आहे. पृथ्वीला निळाग्रह असेही म्हणतात. जिथे जीवन आहे, अशी पूर्ण विश्वात ही एकमेव ज्ञात जागा आहे. पृथ्वीची निर्मिती साधारणपणे ४५७ कोटी वर्षांपूर्वी झालीअस-ावी. तिचा उपग्रह चंद्र साधारणपणे ४५३ कोटी वर्षांपूर्वीपासून तिला प्रदक्षिणा घालू लागला. हिचा व्यास १२,७५६ किमी एवढा आहे. सूर्यापासून तिचे अंतर साधारणपणे १४,९५,९७,८९० किमी एवढे आहे.

पृथ्वीला स्वतः भोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास २४ तास लागतात. तसेच सूर्याभोवती प्रदक्षिणा पूर्ण करण्यास ३६५ दिवस लागतात. या ३६५ दिवसांच्या कालावधीला आपण एक वर्ष म्हणतो. पृथ्वी तिच्या स्वतःभोवती फिरण्याच्या आसापासून २३.५ अंशांनी कललेली आहे. याच स्थितीत ती स्वतःभोवती व सूर्याभोवती प्रदक्षिणा पूर्ण करते, म्हणूनच पृथ्वीवर उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा असे ऋतुचक्र सुरू असते. मानवाला सुखाने जगायचे असेल तर पृथ्वीचा समतोल राखता आला पाहिजे. तिचा समतोल राखण्यासाठी मानवाने वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि वृक्षतोड कमी करणे, प्राणी व पक्षी यांचे कमी होणारे प्रमाण वाढवणे, नद्यांचे जल स्वच्छ ठेवणे, आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे, शेतीत जैविक खतांचा वापर करणे, रासायनिक खते कमी वापरणे यांकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे.

पृथ्वीवर सूर्याचा प्रकाश पोहचण्यासाठी साधारणतः ८ मिनिटे २० सेकंद लागतात. पृथ्वी सूर्याभोवती लंबवर्तुळाकार मार्गाने प्रदक्षिणा पूर्ण करते. या प्रदक्षिणेमध्ये थोडाजरी फरक पडला असता, तर पृथ्वीवर कदाचित जीवसृष्टी निर्माण झाली नसती. पृथ्वीची रचना, गुरुत्वाकर्षण, सूर्यापासूनचे ठराविक अंतर आणि पृथ्वीवर असलेले वातावरण यामुळेच तिच्यावर जीवसृष्टी निर्माण झाली असावी, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. पृथ्वीशिवाय इतर कोणत्याही ग्रहावर जीवसृष्टी नाही. पृथ्वी स्वतः चुंबक असल्याने पृथ्वीभोवती चुंबकिय क्षेत्र आहे, या चुंबकीय क्षेत्रमुळे सूर्यापासून येणारे हानीकारक किरण पृथ्वीच्या धृवीय क्षेत्राकडे वळतात.

पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर भौगोलिक आणि जैविक प्रक्रियांनी तिच्यात खूप परिवर्तन झाले आहे. पृथ्वी आपल्या अक्षाभोवती पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते. ती तळाच्या उंचीचा हिस्टोग्राम तिच्या तळावर पाण्याची विपुलता एक अद्भूत वैशिष्ट्य आहे, जे सौर मंडळाच्या अन्य ग्रहांपासून या निळ्या ग्रहाला वेगळे करते. पृथ्वीच्या जलमंडळात मुख्यतः महासागर आहे, परंतु तांत्रिक रूपाने दुनियेत उपस्थित इतर पाण्याचे स्रोत जसे- अंतर्देशीय समुद्र, तलाव, नदी आणि दोन हजार मीटर खोल भूमिगत पाण्यासहित यात सामावले आहे. पाण्यातील सर्वात खोल जागा १०,९११.४ मीटर खोल प्रशांत महासागरमध्ये मारियाना ट्रेंचची चैलेंजर डीप आहे. कॅनडा मधील रॉकी पर्वत मोराइन लेकला दुर्लक्षित करतो. जीवन टिकवून ठेवणारा एक ग्रह म्हणजे जगणे अस्तित्वात नसले, तरीसुद्धा राहण्यायोग्य असे म्हटले जाते. पृथ्वी द्रव पाणी पुरवते- एक वातावरण जेथे जटिल सेंद्रिय अणू एकत्र येऊन संवाद साधू शकतात आणि चयापचय प्रक्रिया टिकवून ठेवण्यासाठी पुरेशी ऊर्जा देऊ शकतात. माणूस चंद्रावर जाऊन तेथे वास्तव्य करण्याची भाषा- वल्गना करत आहे, मात्र त्याला या साध्या पृथ्वीवर धड चालता येत नाही. त्याच्या अशा बेजबाबदार चालण्या- वागण्यामुळे जीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात आले, तर पृथ्वीचा महाविनाश अटळ आहे. म्हणून मानवजातीचा तळपट थांबविण्यासाठी मानवाने सावध वागलेच पाहिजे, हीच त्याची पूज्य बुद्धी ठरेल! वसुंधरा दिनाच्या समस्त बुद्धिजीवी प्राण्यांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**कृष्णकुमार निकोडे**
गडचिरोली
मो.७७७५०४१०८६

# बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका



बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत. या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात.

उष्माघाताने काहींचा जीवही गेला आहे. दोन वर्षापूर्वी खारघर मध्ये घडलेली घटना अजूनही ताजीच आहे. उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकरांना जीव गमवावा लागला होता. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे.

पुढील काही दिवस देशातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षातील नित्याची बाब झाली आहे.

जम्मू काश्मीर सारख्या निसर्गाच्या नंदनवनात काल निसर्गाने काल जो प्रकोप दाखवला तो पाहून सगळ्यांच्याच काळजाचा ठोका चुकला. जम्मू काश्मीरमध्ये ढगफुटी झाली. या ढगफुटीने जम्मू काश्मीरमध्ये हाहाकार उडाला. क्षणात संपूर्ण प्रदेश जलमय झाला. प्रचंड पाऊस आणि भूस्खलन झाल्याने तीन जनांना आपला जीव गमवावा लागला. या ढगफुटीने जम्मू काश्मीरमधील जनजीवन विस्कळित झाले. शेकडो लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे लागले. तिथे अजूनही बचावकार्य चालू आहे. ऐन उन्हाळ्यात निसर्गाने दाखवलेल्या या उग्र रूपाने सर्वजण आवाक झाले. जम्मू काश्मीरमध्ये अशा प्रकारचा पाऊस यापूर्वी पाहिला नव्हता असे तेथील जुने जाणते लोक सांगत आहेत. केवळ जम्मू काश्मीरच नाही तर देशातील अनेक राज्यात अशाप्रकारचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. ईशान्य आणि दक्षिणेकडील काही राज्यात विजेच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेशात २२ ते २४ तारखे दरम्यान अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल, आणि छत्तीसगड मध्ये २० ते २४ दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे केरळ, कर्नाटक, लक्षद्वीप, आंध्रप्रदेश, तेलंगणा या दक्षिणेकडील राज्यातही पावसाची शक्यता वर्तवली आहे. म्हणजेच देशातील एका भागात कडाक्याचे उन तर दुसऱ्या भागात मुसळधार पाऊस अशी विषम परिस्थिती आहे.

कडाक्याचे ऊन, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ या घटना आताच घडतात असे नाही तर वर्षभर घडत असतात. महाराष्ट्र हे सह्याद्रीच्या कुशीत वसले आहे. पूर्वी सर्व ऋतूंचे आगमन वेळेवर होत होते. मागील काही वर्षात ऋतुमानात मोठे बदल पाहायला मिळत आहे. ऋतुमानच बदलले आहे. पूर्वी पाऊस फक्त पावसाळ्यातच पडत असे आता वर्षभर कोठेना कोठे पाऊस पडताना दिसतो.

पावसाळ्यात दोन दोन महिने पाऊस पडत नाही. कधीकधी दोन दिवस इतका पाऊस पडतो की दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी भरून काढतो. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे याबाबत शेतकरी संभ्रमात असतो. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. काँक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत. निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# भक्तिभाव जागवणारे अजरामर सूर

ईश्वराच्या भक्तीचे अनेक मार्ग आहेत. कोणीतरी ध्यानधारणेत मन रमवतो, तर कोणीतरी सेवापूजेत तल्लीन होतो. परंतु सामान्य माणसाच्या मनाला भिडणारा आणि सर्वाधिक भावस्पर्शी मार्ग म्हणजे भक्तीगीत अर्थातच भजने. हिंदी चित्रपटांनी या भक्तीपर परंपरेचा नेहमीच जागर केला आहे. आजही अशी असंख्य गाणी आहेत जी केवळ चित्रपटांच्याच नव्हे तर लोकांच्या आयुष्याचाही अविभाज्य भाग झाली आहेत.

चित्रपट हे केवळ मनोरंजनाचं माध्यम न राहता, अनेकदा अध्यात्मिक भावनाही जागवणारे ठरले आहेत. अनेक वेळा चित्रपटातील एखादं भक्तीगीत परिस्थिती बदलवून टाकतं, आशेचा किरण देतं आणि मनामध्ये श्रद्धेची जाणीव निर्माण करतं. विशेष बाब म्हणजे भक्तीगीतं फक्त धार्मिक चित्रपटापुरती मर्यादित नाहीत. ॲक्शन, रोमॅन्स, कौटुंबिक कथानकांमध्येही अशी गाणी आपलं स्थान निर्माण करतात.

१९७५ साली आलेला 'जय संतोषी मां' हा चित्रपट भक्तीप्रधान चित्रपटांचं उत्तम उदाहरण ठरतो. अगदी कमी बजेटमध्ये तयार झालेला हा चित्रपट इतका लोकप्रिय झाला की त्याने ब्लॉकबस्टर चित्रपटांची यादी गाठली. या यशामध्ये उषा मंगेशकर, महेंद्र कपूर आणि मन्ना डे यांनी गायलेल्या भक्तीगीतांचा मोठा वाटा होता. 'करती हूं तुम्हारा व्रत', 'मदद करो संतोषी माता', 'जय संतोषी मां' ही गाणी लोकांच्या मनामध्ये आजही तितकीच भावतात.

इतकंच नव्हे तर या चित्रपटात संतोषी मातेची भूमिका साकारणारी अभिनेत्री अनिता गुहा यांना लोकांनी प्रत्यक्ष पूजायला



सुरुवात केली होती. महिपाल यांच्यासारख्या कलाकारांनी 'संपूर्ण रामायण', 'वीर हनुमान' सारख्या अनेक धार्मिक चित्रपटांमधून देवभूमिका साकारून भक्तीचा ठसा अधिक खोलवर उमटवला.

१९७९ मधील 'सुहाग' या अमिताभ बच्चन आणि शशि कपूर यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या चित्रपटातील 'नाम रे सबसे बड़ा तेरा नाम ओ शेरोवाली' हे दुर्गेची स्तुती करणारे गीत अजूनही नवरात्रीत वाजताना ऐकायला मिळते. आशा भोसले आणि मोहम्मद रफी यांच्या गोड आवाजातले हे गाणं आजही गरब्याच्या तालावर उचल घेतं.

भक्तीगीतांची ही परंपरा काळाच्या ओघात अधिकच बहरली. १९५२ मधील 'बैजू बावरा' चित्रपटातील 'ओ दुनिया के रखवाले' हे गीत आजही दु:खी मनाला आधार देतं. मोहम्मद रफी यांच्या भावस्पर्शी आवाजातलं हे गीत हिंदू भक्तीगीतांमधील मोलाचं स्थान पटकावून आहे. त्याचप्रमाणे १९६५ साली आलेल्या 'खानदान' मधील 'बड़ी देर भई नंदलाला' हे श्रीकृष्णावर आधारित गाणं जन्माष्टमीला घरोघरी वाजतं. रफी यांच्या स्वरातून निघालेला हा नंदलालाचा साद अजूनही कानात रेंगाळतो. १९५४ मध्ये आलेल्या 'तुलसीदास' चित्रपटातील 'मुझे अपनी शरण में ले लो राम' या गीतात रामभक्तीची आर्त भावना प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. ही केवळ काही निवडक उदाहरणं आहेत. असंख्य भक्तीगीतांनी केवळ चित्रपटांना यश मिळवून दिलं नाही, तर प्रेक्षकांच्या मनात श्रद्धा, आशा आणि विश्वासाचं बीजही रोवलं. भक्तीगीत हे केवळ श्रवणीय न राहता मन:स्पर्शी ठरतं. हे गाणं जसं ऐकताना डोळ्यांत पाणी आणतं, तसंच मनामध्ये शांतीचा अनुभवही देते. आजही मंदिरे असो वा घरातील पूजास्थळ, अशा भक्तीगीतांशिवाय पूजन पूर्णच होत नाही.

शेवटी एवढंच म्हणता येईल की, भक्तीगीत हे आपल्या चित्रपटसृष्टीचं अध्यात्मिक भान आहे जे कालातीत आहे, आणि मनाला भावणाऱ्या श्रद्धेचं सुंदर रूप आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# मुख्यमंत्र्यांच्या जनता दरबारात ६२६ अर्ज

**नागपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुख्यमंत्री सचिवालयात आयोजित जनता दरबारात जनतेच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांच्या निराकरणासाठी विविध विभागाकडे उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित केल्या. त्यांनी या जनता दरबारात एकूण ६२६ निवेदने स्वीकारली.

महिला व बाल विकास विभागाच्या पिंक ई-रिक्षा वितरण कार्यक्रमाला उपस्थिती लावल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांना भेटण्यासाठी व आपल्या समस्या मांडण्यासाठी नागपूरच्या विविध भागातील नागरिकांनी येथील सिव्हिल लाईन्स परिसरातील हैदराबाद हाऊस या मुख्यमंत्री सचिवालयात गर्दी केली होती. श्री फडणवीस यांना दिव्यांग, महिला, विविध सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या समस्या सांगून निवेदन दिले. त्यांचे म्हणणे ऐकून घेत मुख्यमंत्री यांनी समस्या सोडवण्याबाबत आश्वस्थ केले. दुपारी १२ ते ३ दरम्यान या जनता दरबारात जवळपास २ हजार नागरीक सहभागी झाले होते तर ६२६ निवेदन प्राप्त झाली आहेत.

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्यासह ऊर्जा विभाग, सार्वजनिक बांधकाम, भूमि अभिलेख, समाज कल्याण आदी विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

## कांद्याच्या दरांत घसरण

**नवी मुंबई:** कांद्याचे उत्पादन चांगले आले असल्याने कृषी उत्पन्न समिती बाजारात आता चांगल्या दर्जाच्या कांद्याची आवक वाढायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे कांद्याचे वाढलेले दर कमी होऊ लागले आहेत. घाऊक बाजारात चांगला कांदा १३ ते १६ रुपये प्रतिकिलो झाला आहे. पुढची दोन महिने तरी कांद्याचे दर कमी राहणार असल्याचा अंदाज व्यापारी व्यक्त करीत आहेत.

मागच्या वर्षी अवकाळी आणि बेभरवशाच्या पावसामुळे कांद्याच्या उत्पादनावर मोठा परिणाम झाला होता. त्यामुळे उत्पादन फारच कमी झाल्याने कांद्याच्या दरावर त्याचा परिणाम पाहायला मिळाला होता.

# बाफना टी पॉईंट ते देगलूर नाका भागात मनपाची अतिक्रमणधारकांवर कारवाई

## १४० अतिक्रमणधारकांवर कारवाई करुन दोन ट्रक माल जप्त









**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील वाढत्या अतिक्रमणावर आळा घालण्यासाठी व वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी दक्षिण नांदेड भागातील अतिशय रहदारीचा म्हणुन ओळखला जाणारा बाफना टी पॉईंट ते देगलुर नाका या भागात रस्याच्या दुतर्फा असणाऱ्या अतिक्रमण धारकांवर महानगरपालिकेने कारवाईचा बडगा उगारला. सोमवारी (दि.२१) महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने देगलुर नाका परिसरातील बाफना टी पॉईंट ते देगलुर नाका व देगलुर नाका पोलीस चौकी ते हैदरबाग रस्त्याच्या दोन्ही बाजुने झालेले अतिक्रमण काढले. या कारवाईत जेसीबीच्या सहाय्याने १४० अतिक्रमण धारकांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत तब्बल २ ट्रक माल जप्त करण्यात आला आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार व अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त अजितपालसिंघ संधु यांच्या नेतृत्वात अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली. बाफना टी पॉइंट ते देगलुर नाका ते हैदरबाग या रस्त्यावरील रहदारीस अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणधारकांवर कारवाई करून रस्ता अतिक्रमणमुक्त करण्यात आला. या कारवाईत उपविभागीय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नायक, इतवारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रंजीत भोईटे, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त रावण सोनसळे, क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, डॉ. मिर्झा फरहतुल्ला बेग, राजेश जाधव, गौतक कवडे, अग्निशमन अधिकारी के. जी. दासरे, अतिक्रमण पथक प्रमुख विशाल सोनकांबळे, अनिल चौदंते यांच्यासह महापालिकेचे ७० कर्मचारी तसेच पोलीस विभागातील ८० कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. एकंदरीत महानगरपालिका व पोलीस विभागाच्या संयुक्त विद्यमाने ही जंबो कार्यवाही करुन रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले.

महानगरपालिका हद्दीत मुख्य रस्त्यावर व्यापाऱ्यांनी व नागरीकांनी कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण न करता रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात येत आहे. शहरातील मुख्य रस्ते अथवा इतरत्र अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतांवर दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा महापालिका प्रशासना तर्फे देण्यात आला आहे. यापुढे सुध्दा महानगरपालिका व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने शहरातील अतिक्रमण धारकांवर कारवाई करण्याची मोहिम सुरुच राहील, असे महापालिका प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले.

## मुख्याध्यापिका चिंचोरे-चव्हाण यांना पुरस्कार प्रदान

**लोहा (प्रतिनिधी)–** जुना लोहा शहरातील रहिवासी तथा गोपाळवाडा (ता. मुदखेड) येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.सिमा चिंचोरे - चव्हाण यांना दि. १८ एप्रिल रोजी उपक्रमशील शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी म.रा. प्राथमिक संघटनेचे राज्याध्यक्ष केशवराव जाधव, अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगांवकर, शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, राज्य सरचिटणीस लायक पटेल, राज्य उपाध्यक्ष किशनराव घोलप, जिल्हाध्यक्ष निळकंठ चोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्याध्यापिका सौ.सिमा चिंचोरे - चव्हाण यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## माहूर शहरातील मटण मार्केट व महापुरुषांच्या चौकाच्या सुशोभीकरणासाठी नगराध्यक्षांचे पालकमंत्र्यांना साकडे



**माहूर (प्रतिनिधी) –** तीर्थक्षेत्राच्या माहूर शहरात आवश्यकता असणाऱ्या विविध विकास कामाच्या निमित्ताने माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी पालकमंत्री अतुल सावे यांची भेट घेऊन विविध मागण्याचे निवेदन दिले.

यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, जिल्हाध्यक्ष देशमुख, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अमित येवतीकर, नगरसेविका प्रतिनिधी आकाश कांबळे यांची उपस्थिती होती.

माहूर शहरात विकास कामांना वाव आहे. शहरात अनेक कामे सुरू आहे, तर अजून भरपूर कामे शिल्लक आहे. या पैकी प्रामुख्याने मटण मार्केट, लहान अग्निशमक गाडी, कर्मचारी भरती, दलित वस्ती मधील असलेले विविध विकासकामे, शहरातील महापुरुषांच्या चौकामधील सुशोभीकरण करणे अशा विविध विकास कामाबद्दल पालकमंत्री अतुल सावे यांना निवेदन देण्यात आले. या वेळी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी पालकमंत्री ना. अतुल सावे यांना माहूर दर्शनासाठी येण्याचे निमंत्रण दिले.

## दाभड शिवारात शॉर्टसर्किटने चारा, शेती साहित्य जळून खाक



**अर्धापूर (प्रतिनिधी) –** तालुक्यातील दाभड येथील शेतकरी विकास दवे यांच्या शेतातील कडब्याला शॉर्टसर्किटमुळे सोमवारी आग लागली. यात संपूर्ण चारा व शेती साहित्य जळून खाक झाले आहे. यावेळी परिसरात शेतकऱ्यांनी धाव घेतल्याने मोठा अनर्थ टळला.

दाभड तालुका अर्धापूर येथील शेतकरी विकास माणिकराव दवे यांची ग.नं.१४७ शेतात कडबा पाईप, ठिबक संच आदी साहित्य जळुन नुकसान झाले आहे. दि.२१ रोजी विकास दवे यांच्या शेता बाजुच्या कापलेल्या गव्हाच्या शेतात विद्युत खांबाचा तार तुटून शॉर्ट सर्किटमुळे जाळ झाला. आजुबाजुला असलेले गवत झाडे झुडपे जळत आखाड्या जवळ असलेल्या कडब्याच्या ढिगाने पेट घेतला.

घटनास्थळी परिसरातील शेतकऱ्यांनी धाव घेतल्याने आगीवर नियंत्रण आणता आले. यामुळे बाजूला असलेला जनावरांचा आखाडा आदीचा आगीपासून बचाव करण्यात आला. यात जनावरांचा चारा (वैरण), ठिबक संच ताडपत्री आदी १ लाख १२ हजार रुपये नुकसान झाले असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. मंडळ अधिकारी महेश वाकडे, तलाठी रवी पल्लेवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. शेतकऱ्यास तात्काळ नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे.

## आर्य वैश्य जिल्हा महासभेच्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड

**नांदेड (प्रतिनिधी)–** वासवी भवन सिडको रोड नांदेड येथे महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा नांदेड ग्रामिण जिल्हा पदाधिकाऱ्यांची दि. १८ रोजी बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्षपदी प्रभाकर पत्तेवार, हदगाव कार्याध्यक्ष दत्तात्रय चौधरी, मुखेड सचिव गजानन रंगावार, बोधडी कोषाध्यक्ष सतीश मेडेवार नायगाव यांचा कार्यकारिणीत समावेश आहे. ही कार्यकारिणी तीन वर्षांसाठी असणार आहे.

यावेळी निवडणूक प्रक्रिया राज्य उपाध्यक्ष नंदकुमार मडगुलवार, राज्य बांधकाम समिती सचिव सदानंद मेडेवार, राज्य संघटक प्रदीप कोकडवार, मावळते जिल्हाध्यक्ष विजयकुमार कुंचनवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

उर्वरित कार्यकारणीत उपाध्यक्ष रवींद्र बंडेवार तामसा, सूर्यकांत कोडगिरे लोहा, संजय चिन्नमवार देगलूर, नरेंद्र चिद्रावार धर्माबाद, श्याम मारुडवार हिमायतनगर, प्रशांत पोपशेटवार भोकर, संतोष पिंपरवार किनवट तर सहसचिवपदी विशाल पापीनवार कंधार, विजय कोटगिरे बेटमोगरा, भागवत लोकमनवार कासराळी, गिरीश कोत्तावार मुदखेड, दिलीप मुनगिलवार माहूर, सूर्यकांत कवटीकवार नायगाव तर सह कोषाध्यक्ष प्रल्हाद राजकुंडवार मुखेड, गोविंद पोलावार नरसी, पुरुषोत्तम गंगावार बिलोली, सनीत चक्करवार धर्माबाद, संघटक विशाल रेखावार इस्लापूर, प्रसिद्धी प्रमुख सुनील व्यवहारे हदगाव, कायदेविषयक सल्लागार ॲड. सागर मुखेडकर कंधार, ज्येष्ठ सल्लागार डॉ. संजय पलिकोंडवार हदगाव, सुरेश पंडिलवार मुक्रमाबाद, साईनाथ उत्तरवार कुंडलवाडी यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

उर्वरित जिल्हा कार्यकारिणीत सदस्य म्हणून नितीन कोंडावार लोहा, प्रफुल्ल येरावार कवठा, राजेश महाजन बाऱ्हाळी, राजेश काप्रतवार देगलूर, श्रीकांत मेडीवार देगलूर, विठ्ठल चिद्रवार नरसी, श्रीनिवास चक्करवार धर्माबाद, गिरीश साईनाथ रेखावार भोकर, राजेश मामीडवार अर्धापूर, बालाजी पाम्पटवार अर्धापूर, लक्ष्मीकांत लाभसेटवार तामसा, प्रवीण जन्नावार हिमायतनगर, गोविंद चक्करवार किनवट, अतीश गेंटलवार वाई, सतीश पोर्तलावार मांडवी, ज्ञानेश्वर चित्तरवार उमरीबाजार, यांची जिल्हा कार्यकारणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

## श्री निळकंठेश्वर महादेव मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठापणा, महाप्रसादाचे आयोजन



**नांदेड (प्रतिनिधी)–** एकदंत नगरी, नवीन वसाहत, नेरली परिसरातील श्री निळकंठेश्वर महादेव मंदिर देवस्थानात मूर्ती प्राणप्रतिष्ठान, महापूजा व महाप्रसादाचे सोमवार दि. २१ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले होते.

श्री निळकंठेश्वर महादेव मंदिर परिसरामध्ये मनपाचे माजी सभापती प्रतिनिधी सखाराम तुप्पेकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी नांदेड उत्तर जिल्हा समन्वयक शिवसेना शिंदे गट बळवंत तेलंग दाताळकर, उमटवाडीचे सरपंच दिलीप तेलंग, एकदंतनगरी येथील पोलीस अंमलदार विनोद भंडारे, प्रमोद भंडारे, राजू सोनारीकर, पंकज राठोड, परेश चव्हाण, महादेव कापसे, बाळू तेलंग, दिगंबर कवठेकर, हनुमंत तेलंग दाताळकर इत्यादी उपस्थित होते.

## नांदेडमध्ये संविधान सभागृहासाठी जागा उपलब्ध करून द्या -पालकमंत्र्यांना निवेदन



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय संविधान, कायदे, सामाजिक समस्या, प्रशासकीय बाबी यांचे सखोल ज्ञान प्रत्येक नागरिकाला असणे आवश्यक आहे. त्यासाठी शहरात संविधान सभागृहासाठी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांनी पालकमंत्री ना. अतुल सावे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

हे संविधान सभागृह हे ग्रंथालय, म्युझियम, ऑडिटोरियम, भारतीय संस्कृतीचा इतिहास, प्रशिक्षण केंद्र, विपश्यना केंद्र, कायद्यानियमांची माहिती, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम, आणि भारतीय संविधानाचे सखोल ज्ञान देणारे एक बहुउद्देशीय केंद्र असणार आहे. नांदेड शहरासारख्या ऐतिहासिक व सामाजिकदृष्ट्या संवेदनशील परिसरात अशा केंद्राची उभारणी अत्यंत आवश्यक आहे. जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांनी पालकमंत्री अतुल सावे यांची भेट घेवून लवकरात लवकर संविधान सभागृहासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

या निवेदनप्रसंगी खासदार डॉ. अजित गोपछडे, भाजपा संघटन मंत्री संजय कौडगे, महापालिकेचे माजी सभापती किशोर स्वामी, माजी महानगर अध्यक्ष प्रवीण साले यांची प्रमुख उपस्थिती होती.

## खा. गोपछडे यांचा देशाच्या सीमेवरील भागात मुक्काम



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत-बांगलादेश, भारत पाकिस्तान सीमेवरील गावात जाऊन खासदारांनी निवास करून तेथील नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करावा. विकासाच्या नव्या पर्वाला सुरुवात करावी असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. पंतप्रधानांच्या आवाहनानुसार भारतीय जनता पार्टीचे राज्यसभा सदस्य, खा. डॉ. अजित गोपछडे यांनी सीमेवरील गावात जाऊन निवास केला. त्या गावातील मूलभूत सुविधांसह नागरिकांच्या सुखदुःखाची त्यांनी माहिती जाणून घेतली.

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील सर्वच भागांमध्ये विकास पोहोचवला जात आहे. मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. याशिवाय बांगलादेश आणि पाकिस्तान सीमेवर असलेल्या गावांमधील नागरिकांमध्ये विश्वास आणि नवचैतन्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या खासदारांनी त्या गावात मुक्काम करून तेथील नागरिकांशी हितगुज करावे. त्यांच्या अडीअडचणी समजून घ्याव्यात आणि त्या अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रशासनाला सूचना करून तेथील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते.

या आवाहनानुसार खा. डॉ.अजित गोपछडे यांनी बांगलादेश सीमेवरील मावलिनॉन्ग आणि डावकी या मेघालय राज्याच्या राजधानी शिलाँग पासून शंभर किलोमीटर अंतरावर असलेल्या गावास त्यांनी भेट देऊन निवासी मुक्काम केला. सुरक्षा दलासोबत गावातील नागरिकांशी संवाद साधून त्यांचे मनोबल वाढवले. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पार्टीचे केंद्र सरकार आपल्या पाठीशी कायम असल्यामुळे मनामध्ये कोणतीही भीती बाळगू नये. निश्चितपणे प्रत्येक गावात प्रत्येक गोष्टीची पूर्तता केली जाईल असा विश्वास खा. डॉ. गोपछडे यांनी दिला आहे.

बांगलादेशच्या सीमेवरील भारतीय गावात जाऊन तेथील ग्रामीण जीवनाशी खा. डॉ. अजित गोपछडे समरस झाले. तेथील बालकांसोबत फुटबॉल खेळणे, माता, भगिनी, मुले, सामान्य तरुण आणि ज्येष्ठ नागरिक तसेच सीमासुरक्षा दलाच्या जवानांसोबत हितगुज केले. भारत सरकार द्वारे देशाची सीमा सुरक्षित करण्यासाठी लावण्यात आलेले मजबूत काटेरी कुंपन किती सहाय्यक होत आहे, याबाबत जवानांनी त्यांना महत्त्व सांगितले.

खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आशियातील सर्वात स्वच्छ गांव मेघालयातील मावलिनॉन्ग येथील स्वच्छता तंत्र समजून घेतले आणि तेथून प्रेरणा घेऊन स्वच्छतेचा संकल्प करण्याचे आवाहन केले.

## नांदेड तहसील कार्यालयात लोकशाही दिन उत्साहात



**नांदेड (प्रतिनिधी)–** तहसील कार्यालयात सोमवारी (दि. २१ एप्रिल) तालुकास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात आला होता. यावेळी तहसीलदार संजय वारकड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

उपाधीक्षक भूमि अभिलेख यांच्या अनुषंगाने एक लोकशाही दिनामध्ये प्रकरण प्राप्त त्वरित प्रकरणावर कार्यवाही करण्यासाठी उपाधीक्षक भूमी अभिलेख यांना प्रकरण वर्ग करण्यात आले. तालुकास्तरीय लोकशाही दिन तहसील कार्यालयामध्ये प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी घेतला जातो.

सोमवारी (दि.२१) पार पडलेल्या तालुका स्तरीय लोकशाही दिनासाठी वजिराबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम नारवटकर सहाय्यक गटविकास अधिकारी नांदेड, तालुका आरोग्य अधिकारी मुंडे, लिंबगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सय्यद, उप निबंधक नांदेड बोदगिरे यांच्यासह तालुका कृषी अधिकारी, दुय्यम निबंधक, नायब तहसीलदार (महसूल), नायब तहसीलदार (निवडणूक), तालुका पुरवठा अधिकारी, गटशिक्षणाधिकारी आदी अधिकारी उपस्थित होते. प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे या सेवेचा नागरिकांनी अवश्य लाभ घेऊन आपल्या अडचणी, समस्या सोडवून घ्याव्यात, असे आवाहन तहसीलदार संजय वारकड यांनी केले आहे.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# ऊस शेती : उन्हाळ्यात हव्या प्रभावी सिंचन उपाययोजना

**पाणी हा ऊस उत्पादनातील अतिशय महत्त्वाचा व निर्णायक घटक आहे. उन्हाळ्यात पाण्याचे काटेकोर नियोजन आणि व्यवस्थापन करणे हे ऊस उत्पादनासाठी आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या शक्य असल्यास ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. मात्र ज्या शेतकऱ्यांना ते शक्य नाही, त्यांनी प्रवाही पद्धतीची कार्यक्षमता कशा प्रकारे वाढवता येईल, याची माहिती आपण घेऊ...**

भविष्यामध्ये पाणी या सर्वांत महत्त्वाच्या आणि मूलभूत घटकाची कमतरता वाढत जाणार आहे. पाण्याचा कमीत कमी वापर करून जमिनीची सुपीकता आणि पिकाची उत्पादकता कायम ठेवणे हे आपल्यासमोरील आव्हान ठरणार आहे. एकूण बागायतीपैकी ऊस पिकाखालील क्षेत्र आणि वापरले जाणारे पाणी यामुळे ऊस पीक हे नेहमी टीकेला पात्र ठरते. अशा वेळी पाण्याचा अत्यंत काटेकोर वापर करून अधिक उत्पादन शाश्वत स्वरूपात मिळविणे गरजेचे ठरत आहे. शेतामध्ये ऊस १२ ते १८ महिने उभा असतो. वाढीच्या काळात या पिकास बदलत्या हवामानाला तोंड द्यावे लागते. त्यामुळे ऊस उत्पादनात चढ- उतार आढळून येतात. हिवाळ्यात अति थंडी तर उन्हाळ्यात अति उष्णता अशा परिस्थितीत ऊस पीक वाढत असते. यामुळे अपेक्षित उत्पादन मिळण्यात अडचणी येतात. त्यातही उन्हाळ्यातील पाण्याचे दुर्भीक्ष्य हे उत्पादन घटण्यामागील प्रमुख कारण आहे. महाराष्ट्रातील हवामानाचा विचार करता, मार्च ते जून या कालावधीत ऊस पिकास पाण्याचा मोठ्या प्रमाणावर ताण बसतो. मार्च ते जून या चार महिन्यांत संपूर्ण वर्षातील बाष्पीभवनातील ४० ते ४५ टक्के म्हणजे जवळपास निम्मे बाष्पीभवन होते, तर जुलै ते ऑक्टोबर महिन्यात ३० ते ३५ टक्के आणि उरलेले ३० ते ३५ टक्के हे नोव्हेंबर ते फेब्रुवारी या काळात होते.



## उन्हाळ्यातील हवामान अन् मानवनिर्मित अडचणी...

भूगर्भातील पाण्याची पातळी झपाट्याने खालावत जाते. कालवे व उपसा जलसिंचन योजनांखालील पाण्याच्या पाळीतील अंतर वाढत जाते. विजेचा पुरवठा कमी प्रमाणात होतो. भारनियमनात वाढ होते. त्यात खंड पडतो. हवेतील तसेच जमिनीतील तापमान वाढते. हवेतील तापमान काही वेळा ४५ ते ४८ अंश सेल्सिअसपर्यंत जाते. ऊस पिकाचेही तापमान वाढते. वेगवान व शुष्क हवेमुळे जमिनीतील आणि ऊस पिकातील ओलाव्यात झपाट्याने घट होते. एकूणच बाष्पीभवनाचा वेग वाढतो. उन्हाळ्यात दिवसाचा कालावधी जास्त असतो. दिवसाच्या व रात्रीच्या तापमानातील फरक कमी होतो म्हणजे रात्रीचे तापमानही वाढलेले असते. मुळांभोवती तापमान वाढून त्यांची कार्यक्षमता कमी होते, परिणामी, मुळांद्वारे पाणी व अन्नद्रव्यांच्या शोषणात घट होते. उसाच्या पानावरील पर्णरंध्राद्वारे होणारे बाष्पोत्सर्जन (ट्रान्स्पिरेशन) कमालीचे वाढते. या सर्व परिस्थितीमुळे ऊस पिकास पाण्याचा ताण बसतो. पिकाची समाधानकारक वाढ होत नाही. पाणीटंचाईमुळे ऊस पिकाच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो. मुख्यत्वे वाढीच्या अवस्थेत असलेल्या आडसाली व पूर्वहंगामी उसाच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. अंतिमतः उत्पादनात लक्षणीय घट होते.

### पाण्याच्या ताणाचे दुष्परिणाम

ऊस पिकाची पाने बुडख्याकडून शेंड्याकडे वाळत जातात. मुळांची कार्यक्षमता घटते, त्यामुळे पाणी व अन्नद्रव्यांचे अपुरे शोषण होऊन प्रकाश संश्लेषणाची क्रिया मंदावते. अन्नरसाचे विविध भागांना होणारे वहन कमी होऊन पानातील हरितद्रव्यांचे प्रमाण घटते. उसातील तंतुमय पदार्थांचे प्रमाण वाढून उसात धशीचे प्रमाण वाढते. पूर्वहंगामी व आडसाली उसाची वाढ खुंटते. कांड्यांची लांबी व जाडी कमी होते. उसाचे वजन घटते. सुरू हंगामात लागवड केलेल्या व खोडवा पिकात फुटव्यांचे प्रमाण कमी राहते. परिणामी, गाळपलायक उसाच्या संख्येत घट होऊन उत्पादन कमी येते.

## उपाययोजना करताना...

ऊस उत्पादनातील घट टाळण्यासाठी प्रवाही सिंचन पद्धतीत काही उपाययोजनांचा अवलंब फायदेशीर ठरू शकतो. प्रवाही सिंचन पद्धतीत उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यासाठी लांब सरी, एका आड एक सरी किंवा जोड ओळ पट्टा पद्धतीचा वापर करावा. प्रवाही सिंचनाचे पाट व दांड स्वच्छ ठेवावेत. मे महिन्यातील उपलब्ध पाणी विचारात घेऊन आपल्या शेतातील ऊस पिकाचे क्षेत्र ठरवले पाहिजे. ते त्यानुसार मर्यादित ठेवावे. लांब सरी पद्धतीमध्ये दोन पाळ्यांतील अंतर कमी ठेवावे. प्रत्येक सरीतून उपलब्ध पाण्याचा प्रवाह जास्त खोलीच्या भारी जमिनीत १ ते १.५ लिटर प्रति सेकंद, मध्यम जमिनीत २ ते २.५ लिटर प्रति लिटर पाणी आणि हलक्या जमिनीत २.५ ते ३ लिटर प्रति सेकंद याप्रमाणे विभागून द्यावा. ऊस पिकाची खालील वाळलेली पाने काढून ती आच्छादन म्हणून सरीत पसरावीत. पाचट आच्छादनाने पाण्याच्या दोन पाळ्यांतील अंतर वाढविता येते. किमान पाण्याच्या ३ ते ५ पाळीत बचत होते. शेताच्या बाहेरील बाजूस साधारणपणे एक मीटर पट्ट्याचे पाचट काढू नये. पीक नेहमी तणविरहित ठेवावे. म्हणजे उपलब्ध असलेल्या पाण्यात तण वाटेकरी न होता पाण्याचा उसासाठी पुरेपूर उपयोग होईल. सेंद्रिय व जैविक खतांचा वापर वाढवावा. पाण्याची उपलब्धता पाहूनच रासायनिक खतांचा वापर करावा. पाण्याचे दुर्भीक्ष असल्याने उसास पोटॅश खताची २५ टक्के मात्रा अधिक द्यावी. दर २१ दिवसांनी दोन टक्के म्युरेट ऑफ पोटॅश अधिक दोन टक्के युरिया (प्रत्येकी २० ग्रॅम प्रति लिटर पाणी) यांचे मिश्रण करून फवारणी करावी. पाण्याचा ताण असताना रासायनिक खतांचा वापर जमिनीतून करण्याऐवजी मल्टिन्यूट्रियंट (मॅक्रो आणि मायक्रो) द्रवरूप खतांच्या १ टक्के (१० ग्रॅम प्रति लिटर पाणी) या प्रमाणे १ महिन्याच्या अंतराने तीन फवारण्या कराव्यात. पट्टा किंवा जास्त अंतरावरील लागवड पद्धतीत मधल्या पट्ट्यात हलकी आंतरमशागत (कुळवणी) करावी. पाण्याचा ताण असलेल्या परिस्थितीत काणी व गवती वाढ या रोगांचा आणि खोडकीड, कांडी कीड, वाळवी अशा किडीचा प्रादुर्भाव वाढतो. काणी व गवती वाढ रोगग्रस्त बेटे मुळासहित काढून नष्ट करावीत. खोडकिडीच्या नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनीस या मित्र कीटकाचा अथवा कामगंध सापळे यांचा वापर करावा. १५ मार्चच्या पुढे उसाची नवीन लागवड करू नये. तुटणाऱ्या उसाच्या खोडव्याचे योग्य व्यवस्थापन उदा. पाचट आच्छादन, पाचट प्रक्रिया (युरिया, सिंगल सुपर फॉस्फेट आणि पाचट कुजविणाऱ्या जिवाणूंचा वापर), बुडख्यांची जमिनीलगत छाटणी, नांग्या भरणे आणि मल्टिन्यूट्रियंट द्रवरूप खतांची फवारणी ही कामे करावीत.

# ऊस पीक वाढ, जमिनीनुसार पाणी नियोजन

**उसाला लागणाऱ्या पाण्याची गरज प्रामुख्याने जमिनीचा प्रकार, हवामान विभाग, तापमान, मशागत पद्धती, पाणीवापर कार्यक्षमता यावर अवलंबून असते. उगवणीच्या अवस्थेत (४५ दिवसांपर्यंत) १२ टक्के पाणी, फुटवे फुटण्याच्या अवस्थेत (४५ ते १२० दिवस) २२ टक्के पाणी, मुख्य वाढीच्या अवस्थेत (१२० ते २७० दिवस) ४० टक्के पाणी तर पक्व होण्याच्या अवस्थेत (२७० ते ३६० दिवस) २६ टक्के पाण्याची गरज असते. सध्या पाणीटंचाईचा फुटवे, संख्या, कांड्यांची संख्या आणि वाढीवर परिणाम होऊ शकतो. पिकाच्या वाढीच्या वेळी खते घेण्याची प्रक्रिया चालू असते आणि त्यासाठी मुळांच्या कार्यकक्षेत पुरेसा ओलावा असणे गरजेचे आहे. प्रामुख्याने सुरू आणि पूर्वहंगामी उसाला पाण्याचा ताण जाणवतो.**

१ उष्ण तापमानामुळे पिकाच्या काही महत्त्वाच्या शरीरक्रियाशास्त्रीय आणि जीवरासायनिक क्रियांवर परिणाम होऊन बाष्पीभवनाचा वेग वाढतो. पेशी अंतर्गत पाण्याचा ताण निर्माण होतो. त्यामुळे या काळात योग्य ते व्यवस्थापन केले नाही तर उत्पादनात लक्षणीय घट येते.

२ पाण्याच्या ताणामुळे तीव्रतेनुसार ऊस उत्पादनात सरासरी १५ ते ५० टक्के इतकी लक्षणीय घट येते. बाष्पीभवनाच्या आधारे ५० टक्के ओल उडून गेल्यानंतर उसाला पाणी दिल्यास पाणी कमी लागते. उन्हाळी हंगामात तापमान वाढीमुळे बाष्पीभवनाचा वेग वाढतो. जमिनीतील उपलब्ध पाण्याचे प्रमाण कमी होते. मुळांच्या कार्यक्षेत्रातील तापमान वाढून मुळांची कार्यक्षमता कमी होते. त्यामुळे मुळाद्वारे पाण्याचे व अन्नद्रव्यांचे शोषण कमी होते. हरितद्रव्यांचे प्रमाण घटल्यामुळे पाने पिवळी पडू लागतात.

३ फुटवे लागणे आणि जोमदार वाढीचा कालावधी उन्हाळ्यात येतो, त्याच वेळी पाण्याचा तुटवडा जाणवतो. त्यामुळे कांड्यांची लांबी, संख्या आणि जाडी कमी होऊन वजनात घट येते. उसामध्ये तंतुमय पदार्थांच्या प्रमाणात वाढ होऊन दशीचे प्रमाण वाढते. साखर उतारा घटतो. पाण्याचा तीव्र ताण बसल्यास वाढ खुंटते.

| संवेदनशील अवस्था | कालावधी | पाणी देण्याचे दिवस | | |
|---|---|---|---|---|
| | | हलकी | मध्यम | भारी |
| उगवणीचा कालावधी | ४५ दिवसांपर्यंत | ५- ६ | ६-७ | ८-१० |
| फुटवे फुटणे | ४५ ते १२० दिवस | ६-७ | ७-१० | १२-१५ |
| मुख्य वाढीचा काळ | १२० ते २७० दिवस | ७-८ | १०-१२ | १२-१५ |
| ऊस पक्व होण्याचा कालावधी | २७० ते ३६० दिवस | १० | १२-१५ | १५-२० |



## पाचट आच्छादन

पाचट आच्छादनामुळे जमिनीला भेगा पडण्याची प्रक्रिया लांबते. बाष्पीभवनाचा वेग कमी होतो. जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. पाण्याच्या पाळ्यांतील अंतर वाढवता येते. लागण केलेल्या उसामध्ये कार्यक्षम सात पाने ठेवून वाळलेली ४ ते ५ पाने काढून त्याचे सरीमध्ये आच्छादन करावे. अत्यंत तीव्र उन्हाळा जाणवत असलेल्या ठिकाणी पाचटाचे आच्छादन उपयोगी ठरते. उसाची तोडणी केल्यानंतर हेक्टरी ७.५ टन ते १० टनांपर्यंत पाचट निघते. कडक उन्हाळ्याच्या परिस्थितीत या पाचटाचा वापर आच्छादनासाठी करावा, त्यामुळे बाष्पीभवन कमी होते. उन्हाळ्यामध्ये दिवसा तापमान आणि उष्णता जास्त असल्याने ओलावा थोपविण्यासाठी आच्छादनाचा वापर करावा. हे आच्छादन ठिबक सिंचनासोबत वापरणे जरुरीचे आहे. पाण्याच्या दोन पाळ्यांतील अंतर १५ दिवसांवरून २१ दिवसांपर्यंत वाढवता येते. आच्छादन केलेले पाचट मोठ्या बांधणीच्या वेळी जमिनीत गाडावे. पाणी बचतीसाठी शेतामध्ये सरी आड सरी पाचट टाकून पाण्याची बचत करता येते. पाचटाच्या वापरामुळे दोन महिने पाण्याचा ताण पडलेले पीक वाचवता येते. पाचट आच्छादनामुळे जमिनीचे तापमान राखले जाते, त्यामुळे मुळांची वाढ भरपूर प्रमाणात होते. ऊस लागवड केल्यानंतर दीड महिन्यापासून चार महिन्याच्या उसात पाचट टाकणे शक्य होणार आहे. त्यासाठी पाचट किंवा त्याची कुट्टी आच्छादनासाठी वापरावी. या तंत्राने महिन्याला एका पाण्याच्या पाळीवर ऊस वाचविणे शक्य आहे. आडसाली व पूर्वहंगामी उसामध्ये पाण्याचा ताण पडल्यास एका आड एक सरीतून पाणी द्यावे. उसाची खालील पक्व पाने काढून त्याचे सरीमध्ये आच्छादन करावे. पट्टा पद्धतीने लागवड केली असल्यास ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. पीक तणविरहित ठेवावे. ज्या सरीला पहिल्या रोटेशनला पाणी दिले आहे, त्यानंतरच्या सरीला दुसऱ्या रोटेशनला पाणी द्यावे. यामुळे ४० टक्के पाण्याची बचत होवू शकते.

## पीक अवस्था, जमिनीच्या प्रकारानुसार पाण्याचे नियोजन

१ उन्हाळी हंगामात उसाच्या पानामध्ये ६८ ते ७० टक्के, पानाच्या देठात ७८ ते ८० टक्के, उसामध्ये ८० ते ८५ टक्के आणि मुळांमध्ये ७० ते ७५ टक्के पाणी पातळी असल्यास अन्नद्रव्य तयार करण्याची प्रक्रिया योग्य रीतीने चालू राहते. वाफसा परिस्थितीतील उपलब्ध ओलावा ५० टक्के कमी झाल्यावर उसालापाणी द्यावे.

२ ऊस वाढ आणि जमिनीतील ओलावा यांचे फार घनिष्ठ संबंध आहेत. लागवड भारी जमिनीत केल्यास पाण्याचा ताण हे पीक सहन करू शकते. उगवणीचा कालावधी, फुटवे फुटण्याची अवस्था, मुख्य वाढीचा काळ आणि ऊस पक्व होण्याचा कालावधी या अवस्थांमध्ये पाणी नियोजन गरजेचे आहे.

३ फुटवे फुटणे आणि मुख्य वाढीचा काळ मार्च ते मे या प्रदीर्घ उन्हाळ्यात महिन्यांमध्ये पाण्याचा ताण पडतो. पर्यायाने ४ ते ५ कांडी आखूड पडतात. पावसाळा सुरू झाल्यानंतर पुन्हा लांब कांडी पडतात. म्हणून या महिन्यात उसाच्या मुळाच्या सान्निध्यात पुरेशी ओल ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

४ जमिनीच्या प्रकारानुसार ज्यांच्याकडे पुरेसे पाणी आहे. त्यांनी उन्हाळी हंगामात तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे पाण्याचे नियोजन करावे. संवेदनशील अवस्थेत पाण्याचा ताण पडला आणि नंतरच्या अवस्थेत भरपूर पाणी दिले तरी नुकसान भरून येत नाही.



# म्हशींची काळजी

**उन्हाळ्यातील वाढलेल्या तापमानाचा परिणाम म्हशीमध्ये लक्षणीय पद्धतीने जाणवतो. वर्षभर दूध उत्पादनासाठी उन्हाळ्यात म्हशींचे योग्य प्रकारे संगोपन केल्यास दुग्ध उत्पादन व प्रजनन योग्य राहून उन्हाळ्यातही अधिक फायदा मिळतो.**



म्हशींचे वर्षभर सातत्यपूर्ण दूध उत्पादन व प्रजनन असणे हे किफायतशीर व्यवसायाकरिता महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रात उन्हाळ्यात तापमानाचा पारा हा ४४ अंश सेल्सिअसच्या वर जातो. बहुतांश पशुपालकांकडे म्हशींसाठी गोठ्याची व्यवस्था नसते. त्यामुळे म्हशींना झाडाखाली किंवा कमी सावलीत तर कधी कधी उघड्या जागेत ठेवले जाते. त्यामुळे म्हशीच्या आहारावर, आरोग्यावर तसेच प्रजनन क्षमतेवर विपरीत परिणाम जाणवतो. उन्हाळ्यात वाढलेल्या तापमानामुळे म्हशीवर होणारे परिणाम व याकरिता पशुपालकांनी ठराविक उपाययोजनांचा उपयोग करावा.

## जास्त तापमानाचा म्हशीवर होणारा परिणाम

- म्हशीच्या कातडीमध्ये घामग्रंथीचे प्रमाण कमी असते. त्यामुळे शरीरातील घामग्रंथीद्वारे तापमान नियंत्रण ही क्रिया दिसून येत नाही. यामुळे म्हशी वाढलेल्या तापमानाला लगेच बळी पडतात. यामुळे त्यांच्या शरीराचे तापमान वाढते.
- म्हशींचा रंग हा गडद काळा असतो. त्यामुळे सूर्यकिरणे ही काळ्या रंगात लवकर व जास्त प्रमाणात शोषली जातात. यामुळे म्हशीच्या शरीराचे तापमान जास्त वाढते.
- शरीरातील वाढलेल्या तापमानामुळे म्हशीची भूक मंदावते. साधारणपणे म्हशीची खाद्य खाण्याची क्षमता २५ ते ३० टक्के इतकी कमी होते. यामुळे खाद्यघटकाच्या कमतरतेमुळे दुधाचे उत्पादन ५ ते ७ टक्के इतके कमी होते. कमी खाद्यामुळे म्हशीच्या पोटातील सामू (ph) बदलतो व आम्लता वाढते.
- शरीराचे तापमान नियंत्रित राहण्यासाठी, शरीरातील खनिजे तसेच सोडिअम, पोटॅशियम इत्यादीचे जास्त उत्सर्जन होते. यामुळे त्यांची कमतरता जाणवते.
- वाढलेल्या तापमानामुळे शरीरातील पाण्याची पातळी फारच कमी होते. यामुळे म्हशींना अशक्तपणा, जाणवतो व भूक मंदावते. यामुळे दूध उत्पादन कमी होते.
- म्हशींना जर उन्हात बांधलेले असेल तर प्रखर सूर्यकिरणांमुळे शरीरातील संप्रेरकाचे संतुलन बिघडल्यामुळे काही म्हशींचा कालावधी पूर्व किंवा गर्भपात होतो यामुळे आर्थिक नुकसान होते.
- म्हशी मुळातच शांत किंवा मुका माज दाखवितात. माजाची लक्षणे म्हशीमध्ये तीव्र नसतात. उन्हाळ्यात आणखीन परिणाम होऊन म्हशी उन्हाळ्यात माजावर येत नाहीत. माजावर आलेल्या म्हशीच्या माजाचा कालावधी कमी राहतो (६ ते ८ तास). बहुतांश म्हशी रात्रीचा माज दाखवतात व शांत माजामुळे माजाचे निदान होत नाही.
- उन्हाळ्यात म्हशींमध्ये माज निदानानंतर गर्भधारणेचे प्रमाण कमी असते. गर्भ तयार झाल्यावरही अति उष्ण तापमानामुळे गर्भ टिकून राहू शकत नाही.

## खाद्याचे नियोजन

- उन्हाळ्यात म्हशींची भूक कमी होते. त्यामुळे त्यांना खाद्य घटकाची कमतरता जाणवते. याची भरपाई करण्यासाठी म्हशीच्या खाद्यामध्ये जास्त ऊर्जा देणारे घटक उदा. तेल, फॅट इत्यादीचा वापर करावा. लवकर ऊर्जा मिळण्यासाठी ऊसाची मळी किंवा गूळ इत्यादीचा वापर करावा. यामुळे ऊर्जा तयार होऊन दूध उत्पादन टिकून राहील.
- म्हशींना सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत खाद्य देऊ नये. म्हशींना जेव्हा बाहेरील तापमान कमी असेल त्यावेळेस कुट्टी केलेला कडबा किंवा मका, बाजरीची कुट्टी द्यावी. शक्यतो संध्याकाळी ६ ते सकाळी १० वाजेपर्यंत चारा व खाद्य द्यावे.
- शरीरावाटे बाहेर पडणारी खनिजे, सोडिअम व पोटॅशियम यांची पातळी टिकवण्याकरिता खाद्यामध्ये खनिज मिश्रण द्यावे व सोबत दररोज ५० ग्रॅम मोठे/जाडे मीठ द्यावे.
- म्हशींना कमीत कमी ४ ते ५ वेळा थंड पाणी पाजावे. शक्यतो २४ तास पाण्याचा पुरवठा असल्यास उन्हाचा परिणाम कमी जाणवतो आणि दूध उत्पादन टिकून राहण्यास मदत होते.
- खाद्यात दररोज ५० ग्रॅम खाण्याचा सोडा दिल्यास पोटातील (ph) सामू हा टिकून राहून खाद्याचे पचन उत्तम होते. याचा थेट दूध उत्पादनावर चांगला परिणाम दिसून येतो.

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त 'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' उपक्रमात सहभागी व्हा!

## २२ एप्रिल ते १ मे या कालावधीत राज्यात विविध उपक्रम साजरे होणार

**मुंबई**–पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जागतिक वसुंधरा दिन मंगळवार, दि. २२ एप्रिल ते महाराष्ट्र दिन १ मे २०२५ या कालावधीत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने राज्यात 'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी केले आहे.

'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' या उपक्रमांतर्गत मंत्री पंकजा मुंडे या स्वतः २२ एप्रिल रोजी मुंबईतील पवई तलाव येथे स्वच्छता मोहिमेत सहभागी होणार आहेत. या उपक्रमात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

श्रीमती मुंडे म्हणाल्या, २२ एप्रिल हा जागतिक वसुंधरा दिवस आहे. या दिवशी आम्ही पर्यावरण वातावरणीय बदल विभागामार्फत एक अत्यंत चांगली संकल्पना राबवत आहोत. ती संकल्पना म्हणजे जागतिक वसुंधरा दिवसाच्या पासून म्हणजे, २२ एप्रिल ते १ मे महाराष्ट्र दिनापर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जसं आपण नवरात्र साजरा करतो, नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा करतो, आराधना करतो, तसंच वसुंधरेची आराधना करण्यासाठी हे नऊ दिवस विविध कार्यक्रम आपण सर्वांनी राबवावेत. २२ एप्रिल रोजी या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. मी स्वतः २२ एप्रिल रोजी पवई लेक मुंबई येथून स्वच्छतेची सुरुवात करणार आहे. दि. २२, २३ आणि २४ एप्रिल रोजी आपण सर्वांनी आपापल्या भागातील, आपल्या गावातील, आपल्या तालुक्यातील, आपल्या जिल्ह्यातील, आपल्या महानगरातील, नगरातील पाण्याचे विविध स्रोत साफ करायचे आहेत. नद्या, नाले, तलाव ह्यांची स्वच्छता करायची आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकापासून ते जिल्हा परिषद सीईओपर्यंत, तलाठ्यापासून ते जिल्हाधिकारीपर्यंत, ग्रामपंचायतच्या सरपंच, सदस्यापासून ते जिल्हा परिषद अध्यक्षापर्यंत आणि आमदार, खासदार, पालकमंत्री या सर्वांनी यामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

याबरोबर शासकीय यंत्रणासमवेत वेगवेगळ्या संघटना, स्वयंसेवी संस्था यांनी देखील यामध्ये सहभाग घ्यावा. नदी-नाले, सरोवर स्वच्छ करणाऱ्या लोकप्रतिनिधीचे, अधिकाऱ्याचे आणि सामाजिक संस्थेचे मूल्यमापन करून त्यांचासुद्धा जिल्हा पातळीवर पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहणानंतर सन्मान होईल आणि राज्यभरातून अशा अत्यंत चांगल्या काम केलेल्या लोकांचा राज्यपातळीवरही सन्मान होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### शिवनेरी किल्ल्यावर मधमाशांचा पर्यटकांवर हल्ला!

**पुणे :** शिवनेरी किल्ल्यावर पुन्हा एकदा पर्यटकांवर मधमाशांनी हल्लाबोल केला आहे. या हल्ल्यात १६ जण जखमी झाले असून पाच बालकांचा यात समावेश आहे. या आधीही शिवनेरीवर चार वेळा अशाप्रकारचा हल्ला मधमाशांनी पर्यटकांवर केला होता.

पुण्यातील शिवनेरी किल्ल्याचा इतिहास सर्वदूर पसरलेला आहे. शिवनेरी किल्ल्यावर सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पर्यटक पर्यटनासाठी येतात. शुक्रवार, शनिवार, रविवार या जोडून आलेल्या सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांनी शिवनेरी किल्ल्यावर पर्यटन करण्यास पसंती दर्शवली. रविवारी पर्यटकांची तुलनेने जास्त गर्दी होती. या गर्दीत मोठ्यांसह लहानांचा देखील समावेश होता. रविवारी सकाळच्या सुमारास पर्यटनाचा आनंद घेणाऱ्या पर्यटकांवर झाडावर असलेल्या मधमाशांनी हल्ला केला. या हल्ल्यात १६ पर्यटक गंभीर जखमी झाले. यामध्ये पाच लहान मुलांचा देखील समावेश आहे.

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला नक्षलवादी संघटना म्हणून जाहीर करा; अभय वर्तक यांची मागणी

**मुंबई :** डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला नक्षलवादी संघटना म्हणून जाहीर करा, अशी मागणी सनातन संस्थेचे अभय वर्तक यांनी केली. दाभोळकर हत्या प्रकरणात निर्दोष सुटलेले विक्रम भावे यांच्या 'दाभोळकर हत्या आणि मी' या पुस्तकाच्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी ही मागणी केली. अंनिस संघटनेवर प्रशासक नेमण्याचा यावा, तसेच अंनिसला परदेशातून फंडिंग होत असल्याचा गंभीर आरोप वर्तक यांनी केला आहे. त्यावरून नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.



अंधश्रद्धा निर्मूलन समिती अर्थात अंनिस गेल्या अनेक वर्षांपासून अंधश्रद्धेविरोधात काम करते. मात्र या अंनिसलाच नक्षलवादी संघटना म्हणून जाहीर करा, अशी मागणी सनातन संस्थेचे अभय वर्तक यांनी केली. दाभोळकर हत्या प्रकरणात निर्दोष सुटलेले विक्रम भावे यांच्या 'दाभोळकर हत्या आणि मी' या पुस्तकाच्या कार्यक्रमात बोलताना वर्तक यांनी हे वक्तव्य केल आहे. अंनिस संघटनेवर प्रशासक नेमण्याची मागणीही वर्तक यांनी केली. तसंच अंनिसला परदेशातून फंडिंग होत असल्याचा आरोप वर्तक यांनी केला आहे.

अभय वर्तक यांच्या या वक्तव्यावरून नवा वाद उफाळण्याची शक्यता आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत भाजपची सत्ता आहे. त्यामुळं कुणी चुकीचं कृत्य करत असेल तर पुरावे देऊन कारवाई करा, असा सल्ला काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळांनी यावर भाष्य केलंय. काही चुकीचं घडत असेल तर सरकार लक्ष घालेल, असं भुजबळांनी म्हटलंय.

राज्यात आणि देशात हिंदुत्ववादी सरकार आहे. त्यामुळे आता अंनिसला नक्षलवादी संघटना म्हणून जाहीर करणं शक्य असल्याचंही अभय वर्तक यांनी म्हटलंय. दाभोळकर हत्या आणि मी या पुस्तकाच्या कार्यक्रमातच वर्तक यांनी हे वक्तव्य केल्यानं नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

# एलॉन मस्क यांच्या आईने घेतले सिद्धिविनायकाचे दर्शन



**मुंबई :** प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिर हे केवळ मुंबईकरांचे नव्हे तर परदेशी पाहुण्यांचेही श्रद्धास्थान बनले असून, अनेक सेलिब्रिटी आणि परदेशी पाहुणे या मंदिराला भेट देतात. जगप्रसिद्ध उद्योगपती एलॉन मस्क यांच्या मातोश्रींनी आज मुंबईतील सिद्धिविनायक मंदिरात दर्शन घेतले. श्रद्धेने ओतप्रोत भरलेल्या वातावरणात त्यांचे मंदिरात आगमन झाले आणि उपस्थित भाविकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली.

टेस्ला आणि स्पेसएक्सचे संस्थापक एलॉन मस्क यांच्या बाबत जगभरात कुतूहल असताना, त्यांच्या आईने भारतात येऊन सिद्धिविनायकाचे दर्शन घेणे हे विशेषच ठरले. मंदिर प्रांगणात दोघींनीही काही काळ शांतपणे पूजा केली आणि मंदिर व्यवस्थापनाशी सौजन्यपूर्वक संवाद साधला.

टेस्लाचे सर्वेसर्वा एलॉन मस्क यांच्या आई माये मस्क सध्या मुंबईत आहेत. गेल्या आठवड्याभरापासून ७७ वर्षीय माये मस्क मुंबईतच मुक्कामी असून त्यांचा यंदाचा वाढदिवसदेखील त्यांनी मुंबईतच साजरा केला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त एलॉन मस्क यांनी आईसाठी फुले पाठवल्याचा फोटो माये मस्क यांनी सोशल मीडियावर पोस्ट केला. त्यानंतर आज माये मस्क यांचे सिद्धिविनायक मंदिरातील फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. या फोटोंमध्ये त्यांच्यासमवेत अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसदेखील दिसत आहे.

माये मस्क यांनी 'ए वुमन मेक्स अ प्लान' हे पुस्तक लिहिलं असून, त्या पुस्तकाच्या हिंदी आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्यासाठी माये मस्क मुंबईत दाखल झाल्या आहेत. आज त्यांच्या हस्ते त्यांच्या पुस्तकाचं प्रकाशन करण्यात आलं. यानंतर त्यांनी 'राजकमल बुक्स'ला टॅग करून पुस्तकांसोबत एक फोटोही सोशल मीडियावर शेअर केला आहे. या फोटोमध्ये त्यांनी पुस्तकाची हिंदी आवृत्ती भाषांतरीत करून प्रकाशित केल्याबद्दल राजकमल बुक्सचे आभार मानले आहेत.

दरम्यान, जेव्हा विज्ञान विश्वातील एका दिग्गजाच्या मातोश्रींनी भारताच्या अध्यात्मिक परंपरेला नमन करत सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले, तेव्हा उपस्थित भाविकांसाठी हा एक अप्रतिम क्षण ठरला.

### परदेशात नोकरीचं आमिष, अनेकांची फसवणूक

**मुंबई:** २०२२ ते २०२४ दरम्यान, कंबोडियातील भारतीय मिशनद्वारे १,१६७ भारतीय नागरिकांची सुटका करण्यात मदत करण्यात आली. काही महिन्यांपूर्वी, परराष्ट्र मंत्रालयाने संशयास्पद कंपन्यांनी बनावट नोकरीच्या जषषर्शी दिल्याची प्रकरणे नोंदवली होती. परदेशी नोकरीच्या बहुतेक जषषर्शी सोशल मीडियाद्वारे पसरवल्या गेल्या होत्या. भारतीयांना कंबोडियासह आग्नेय आशियाई देशांमध्ये नोकरीच्या संधींचे आमिष दाखवण्यात आले. त्यानंतर या देशांमध्ये कार्यरत असलेल्या घोटाळ्याच्या केंद्रांमधून पीडितांना सायबर गुन्हे आणि इतर बेकायदेशीर कृत्ये करण्यास भाग पाडले जात असे.

# जालना पॉलिटेक्निक कॉलेज होस्टेलमधील विद्यार्थ्याचा मृत्यू, रेक्टरवर निष्काळजीपणाचा आरोप






**जालना :** जिल्ह्यातील अंबड येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहणाऱ्या एका १९ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली. कन्हैया गहुले असे मयत विद्यार्थ्याचे नाव असून तो पॉलीटेक्निकच्या प्रथम वर्षात शिकत होता. वसतिगृहाच्या निष्काळजीपणामुळे आपल्या मुलाला जीव गमवावा लागल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे.

कन्हैया गहुले या विद्यार्थ्याला रविवारी सकाळी अचानक चक्कर आली. त्यावेळी मित्रांनी तातडीने रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला. मात्र उपचाराआधीच त्याचा मृत्यू झाला. या प्रकारावर मयत विद्यार्थ्याच्या वडिलांनी गंभीर आक्षेप नोंदवले. कॉलेज प्रशासन आणि वसतिगृहाचे रेक्टर यांनी वेळेवर योग्य ती मदत न दिल्याचा आणि हलगर्जीपणा केल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकरणी रेक्टरवर गुन्हा दाखल करण्याची मागणीही करण्यात आली.

या प्रकरणाचा पुढील तपास अंबड पोलीस करत आहेत. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर मृत्यूचं नेमकं कारण स्पष्ट होणार असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

# राज्यपालांकडून राहुल पांडे यांना राज्य मुख्य माहिती आयुक्त पदाची शपथ

**मुंबई** – राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी ज्येष्ठ पत्रकार राहुल पांडे यांना राज्याच्या मुख्य माहिती आयुक्त पदाची शपथ दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राजभवन मुंबई येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभात राज्यपालांनी रवींद्र ठाकरे, प्रकाश इंदलकर व गजानन निमदेव यांना देखील राज्य माहिती आयुक्त पदाची शपथ दिली.

सुरुवातीला राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे तसेच इतर माहिती आयुक्त यांच्या नियुक्तीची अधिसूचना वाचून दाखविली.

## टी.सी.हरवली

माझे गौतम रामराव बहाद्दुरे रा. विजयनगर नांदेड या नावाचे घराचे महत्त्वाचे कागदपत्र व इतर महत्त्वाचे कागदपत्र मा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे जात असताना ऑटो प्रवासात हरवले आहे. ज्यांना कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **–संपर्क पत्ता – गौतम रामराव बहाद्दुरे रा. विजय नगर, नांदेड मो. ९५६१७८९९३०**

# जम्मू काश्मीरला पावसाचा जबर तडाखा; शाळा बंद, जनजीवन विस्कळीत

**श्रीनगर :** सलग तीन दिवस जम्मू काश्मीरमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. लडाख या केंद्राशासित भागात अनेक ठिकाणी हिमवृष्टी सुरू आहे. राज्यात काही ठिकाणी गारा पडल्या तर काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. वादळी वारे, गारपीट, मुसळधार पाऊस, ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट, निवडक ठिकाणी झालेली हिमवृष्टी यामुळे सामान्यांचे हाल होते आहेत. फळबागांचे नुकसान झाले आहे. काश्मीरमध्ये बांदीपोरा जिल्ह्यात हिमवृष्टी सुरू आहे. सततच्या हिमवृष्टीमुळे गुरेझ-बांदीपोरा हा वाहतुकीच्यासाठी महत्त्वाचा असलेला रस्ता बंद केला आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील वाहतूक ठप्प झाली आहे. अनेक रस्त्यांवर पावसाचा तडाखा बसल्यामुळे चिखल झाला आहे. वाहने चालवणे अशक्य झाले आहे. चालत प्रवास करणेही कठीण झाले आहे. सरकारने लोकांना जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरून नाशरी आणि नवयुग बोगद्यादरम्यानचा प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. रामबनमध्ये जमीन खचल्यामुळे महामार्गाचे नुकसान झाले आहे. महामार्ग पुन्हा कार्यरत करण्यासाठी किमान ४८ तास लागतील, असा प्राथमिक अंदाज आहे. प्रशासनाने राज्यात अनेक ठिकाणी शाळा पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.


## Change In Name

My Old Name is NAMRATA ASHISHKUMAR BAKLIWAL which now I am changing as New Name NAMRATA ASHISH BAKLIWAL. Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same ADD-DILIPSINGH COLONY VAZIRABAD NANDED-431601
Mo. 9325871999


## Change In Name

My Old Name is ASHISHKUMAR BAKLIWAL which now I am changing as New Name ASHISH JAIKUMAR BAKLIWAL. Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same ADD-DILIPSINGH COLONY VAZIRABAD NANDED-431601
Mo. 9325871999

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## दुकान नं. 8,10,11,12

ये है दुकान बेचना है



संपर्क करे : सय्यद अलीम
8767009764
रा.बागवान गल्ली सराफा नांदेड


# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वॉररुम बैठकीत घेतला १५ प्रकल्पांचा आढावा

**मुंबई**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वॉररुम बैठकीमध्ये मागील बैठकांमधील १८ प्रकल्प आणि नवीन १५ महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेतला. राज्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून हे प्रकल्प महत्त्वाचे असून, दिलेल्या वेळापत्रकानुसार या प्रकल्पांचे काम व्हावे, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.

मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविण परदेशी यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते. तर दूरदृष्यप्रणालीद्वारे विविध विभागांचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वॉररुम बैठकीमध्ये मुंबईसह, विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील विविध महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये मुंबईतील मेट्रो लाईन २ बी (डीएन नगर ते मंडाळे), मेट्रो लाईन ४ (वडाळा ते कासारवडवली), मेट्रो लाईन ५ (ठाणे-भिवंडी-कल्याण), मुंबई मेट्रो ६ (स्वामी समर्थनगर-विक्रोळी), मुंबई मेट्रो ७ ए (अंधेरी-छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २), मुंबई मेट्रो लाईन ९ (दहिसर (पू) ते मिरा भाईंदर), ऑरेंज गेट ते मरिन ड्राईव्ह टनेल प्रकल्प, बोरिवली ते ठाणे जोड बोगदा प्रकल्प, उत्तन-विरार सी लिंक, शिवडी-वरळी ईलेव्हेटेड कॉरिडॉर, पुणे मेट्रो, दहिसर ते भाईंदर लिंक रोड, गोरेगाव मागाठाणे डीपी रोड, गोरेगावमुलुंड लिंक रोड आणि उत्तर सागरी किनारा मार्ग या प्रकल्पांचे सादरीकरण झाले.

यावेळी प्रकल्पांच्या कामांची सद्यःस्थिती, कामात येणाऱ्या अडचणी आदींबाबत चर्चा झाली.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, विकासात्मक प्रकल्पांची कामे गतीने पूर्ण होण्यासाठी त्यांचे सूक्ष्म नियोजन करावे. संबंधित यंत्रणांनी त्यांच्या स्तरावर आवश्यकतेनुसार बैठका घेऊन कामातील अडचणी दूर कराव्यात, जेणेकरून विकास प्रकल्पांची कामे निर्धारित वेळेत (ढळाश ईंपव) पूर्ण करता येतील. विकास प्रकल्पांची कामे गतीने करण्यासाठी भूसंपादन प्रक्रिया गतीने राबवून संबंधित यंत्रणेला विकास कामासाठी जमीन उपलब्ध करून द्यावी. ज्या ठिकाणी वन व पर्यावरण विषयक परवानगी आवश्यक आहे, ती घेण्यात यावी. तसेच आवश्यकतेनुसार झोनल मास्टर प्लॅन तयार करावा. धारावी सारख्या प्रकल्पाचे अचूक सर्वे करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा.

विदर्भ व मराठवाड्याला जोडणाऱ्या वर्धा-नांदेड रेल्वे प्रकल्पासाठी जमीन संपादनाचा विषय मार्गी लावावा. वर्धा-गडचिरोली रेल्वे लाईनमध्ये खासगी जमीन खरेदी प्रक्रिया सात दिवसांत करावी. सागरी वाहतुकीसाठी महत्त्वाचा ठरणाऱ्या वाढवण बंदर प्रकल्पामध्ये वन जमिनी संदर्भात मार्ग काढून याबाबत निर्णय घेण्यात यावा. वाढवण बंदर हा राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रकल्प असून, यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. त्यानुसार या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठीही निर्णय गतीने घेतले जावेत, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

मुंबई व पुणे येथे मेट्रो प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या जागांबाबतही प्राधान्याने कार्यवाही करावी. आवश्यक असलेल्या ठिकाणी तात्काळ भूसंपादन करावे. छत्रपती संभाजीनगर समांतर शहर पाणीपुरवठा योजनेत तांत्रिक अडचणी दूर करून तातडीने कामे सुरू करावीत. मागाठाणे ते गोरेगाव डीपी रोडसाठी मुंबई महानगरपालिकेने जमीन संपादन करून घ्यावी. या मार्गासाठी आवश्यक वन्यजीव विषयक परवानगी त्वरित देण्यात याव्यात. तसेच एमएमआरडीएने प्रकल्पग्रस्तांसाठीच्या सदनिका बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित कराव्यात, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मागील वॉररुम बैठकीत सुमारे १८ प्रकल्पांचा आढावा घेतला होता. त्यावेळी ७३ अडचणींवर चर्चा झाली. त्यापैकी ३१ अडचणींवर मार्ग काढण्यात आले, तर उर्वरित अडचणींवर मार्ग काढण्याची कार्यवाही सुरू आहे. मागील बैठकीत दिलेल्या सूचनांच्या अंमलबजावणीची माहिती मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत घेतली. कार्यवाही न केलेल्या सूचनांवर तातडीने मार्ग काढून कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.


# कार्यालय नगरपंचायत अर्धापूर, जि. नांदेड

जा.क्र./अनपं/बांधकाम/८२६/२०२५ दि.२१/०४/२०२५

# जाहीर लिलाव सूचना क्र. १ (सहावी वेळ)

## (२५% अधिमूल्य व मासिक भाडे कमी करून)

सर्व नागरिक, व्यावसायिक, व्यापारी, एजन्सी, संस्था यांना कळविण्यात येते की, अर्धापूर नगरपंचायत मालकीच्या गट क्रमांक ६०० अग्निशमन इमारती जवळील व्यापारी संकुलातील रिकाम्या दुकान/गाळ्यांचा ३ वर्षे मुदतीकरिता भाडेदर कायम ठेवून अधिमूल्य रक्कमेवर जाहीर लिलावाद्वारे जादा दरांची बोली करणाऱ्या/बोलणाऱ्या लिलावधारकास दुकानगाळे भाडेपट्ट्याने देण्यात येणार आहे. जाहीर लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी सर्व माहिती, सूचना, अटी व शर्ती, शुद्धीपत्रके, बांधकाम विभाग, नगरपंचायत अर्धापूर येथे उपलब्ध आहे. जाहीर लिलाव फी रक्कम रु १०००/- चा व इसारा रक्कम रु १०,०००/-रक्कमेचा वेगवेगळा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT ARDHAPUR या नावाने काढण्यात यावा. सदर धनाकर्षाची छायाप्रत लेखा विभाग नगरपंचायत अर्धापूर येथे जमा करून, अटी/शर्ती मान्य असल्याचे बंधपत्र स्वाक्षरी करून बांधकाम विभाग नगरपंचायत अर्धापूर येथे दि. २९.०४.२०२५ रोजी पर्यंत सादर करण्यात यावे.

| तपशील | पासून | पर्यंत |
|---|---|---|
| दस्ताऐवज सादर करण्याची मुदत | दि. २२.०४.२०२५ सकाळी ११.०० वाजता | दि. २९.०४.२०२५ सायंकाळी ५.०० वाजता |
| प्राप्त दस्त/कागदपत्र तपासणी दिवस<br>जाहीर लिलाव बोलीचा दिवस व ठिकाण | दि. ३०.०४.२०२५ सकाळी ११.००<br>दि. ०५.०५.२०२५ दुपारी १२.०० वा.<br>अग्निशमन इमारत व्यापारी संकुल, तहसील जवळ, अर्धापूर | |

ता. अर्धापूर
जि.नांदेड
(शैलेश फडसे) मुख्याधिकारी
अर्धापूर नगरपंचायत, जि. नांदेड

**स्थलांतर**
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गट्टूम मार्केट, पहिला मजला, शिवाजी नगर, नांदेड

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## वाहतूक शाखेचा बेशिस्त वाहनधारकांवर कारवाईचा बडगा

### वाहनधारकांकडून ३ लाख ६९ हजारांचा दंड वसूल

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरात वाढत असलेली वाहतूक समस्या नियंत्रणात आणण्यासाठी शहर वाहतूक शाखेने रविवारी कारवाईचे सत्र सुरू केले. यात अवैध प्रवाशी वाहतूक तसेच विना परवाना, परमिट चालणारे वाहने, भरधाव वाहनांवर कारवाई करीत तब्बल ३ लाख ६९ हजार ३५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.



शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार यांनी वजिराबाद व इतवारा शहर वाहतूक शाखेला आदेश दिले होते. त्यानंतर रविवारी (दि.२० एप्रिल) वजिराबाद शहर वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक साहेबराव गुड्डे सिटीबी स्टाफ व दंगल नियंत्रण पथकातील पोलीस अंमलदारांच्या मदतीने रेल्वे स्थानक, महाराणा प्रताप चौक, तरोडेकर मार्केट व कलामंदिर येथील वाहतूकीस अडथळा निर्माण होणारे अवैध अतिक्रमण करणाऱ्यांवर व वाहनावर दंडात्मक कार्यवाही केली. यात १८ पेड केसेस करून ६ हजार ६०० रूपयांचा दंड, ऑनलाईन युपीआयव्दारे केसेस ८ कारवाईत ६, ५० रूपयांचा दंड, अनपेड केसेस १३३ वाहनधारकांनी १ लाख ८३ हजार ५०० रूपयांचा दंड, ट्रीपल सिटच्या ६ केसेस ६ हजार रूपयांचा दंड, गणवेश परिधान न केलेले ऑटोचालक ५७ केसेस ४८ हजार ५०० रूपयाचा दंड अशा एकूण २२२ केसेस करून २ लाख ५० हजार ८५० रूपयांचा दंड आकारण्यात आला.

तसेच इतवारा शहर वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक राजकुमार हिंगोले यांनी स्टाफ व दंगल नियंत्रण पथकातील पोलीस अंमलदारांच्या साह्याने देगलूर नाका, जुना मोंढा व बर्की चौकात वाहनांची तपासणी केली. तपासणीत कागदपत्र नसल्यामुळे, गणवेश परिधान न करणारे ऑटो चालक, तसेच विना परवाना चालणारे वाहन, अवैध प्रवाशी वाहतूक व इतर केसेस अशा एकूण १२६ केसेस करून एकुण १ लाख १८ हजार ५०० रूपयांचा दंड आकारण्यात आला.

दोन्ही शहर वाहतूक शाखेने शहरात मोहीम राबवून एकत्रित ३४८ केसेस करून एकूण ३ लाख ६९ हजार ३५० रूपये दंड आकारण्यात आला आहे.

## संभाजी महाराजांचे स्मारक नांदेड शहरात बनवा

### सकल मराठा समाजाचे पालकमंत्र्यांना निवेदन



**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड शहरात अनेक महापुरुषांचे स्मारकं आहेत. परंतु शहरात कुठेही छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक नाही. त्यामुळे छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक नांदेड शहरात बनवा, अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने पालकमंत्री ना. अतुल सावे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

नांदेड शहर हे शिक्षणाचे हब बनले आहे. या शहरात शिक्षण घेण्यासाठी बाहेर गावातून तसेच अनेक ग्रामीण भागातून कित्येक विद्यार्थी विद्यार्थिनी येत असतात. अशा शालेय व महाविद्यालयीन जिवनात ज्या महापुरुषांच्या विचारांना त्यांच्या स्मृतींना आपण उजाळा देतो, त्यांचाच प्रभाव आपल्या भविष्यावर पडत असतो. मग अशा वेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रखर शौर्याचा आणि पराक्रमाचा इतिहास तमाम नांदेडकरांच्या जिवनाला भेदावा. त्यांच्या प्रचंड त्यागाला बलिदानाला चिरंतर स्मरून त्यांना अभिवादन करता यावे, यासाठी नांदेड शहरात भव्य असे छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक उभे राहावे, अशी इच्छा तमाम नांदेडकरांची आहे. त्यामुळे येत्या १४ मे पर्यंत म्हणजेच छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती पर्यंत नियोजित जागा पाहुन त्याचे भूमिपूजन करावे, अन्यथा येत्या काळात नांदेड जिल्ह्यातील शिव-शंभूराजे भक्तांकडून महाराजांचा पुतळा बसवण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी निवेदनावर दशरथ पाटील कदम, श्याम पाटील वडजे, सुभाष पाटील कोल्हे, संकेत पाटील, सुनिल पाटील कदम, दिलीप पाटील दळवे, नवनाथ जोगदंड यांच्या स्वाक्षरी आहेत.

## जुन्या वादातून दोघांवर प्राणघातक हल्ला; तिघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– बळीरामपूर येथील दोघांवर याच भागातील पाच जणांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून खंजरने प्राणघातक हल्ला केला. यात दोघ जखमी झाले असून एकावर नांदेडच्या विष्णुपुरी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यातील तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली असून दोघेजण फरार असल्याचे सांगण्यात आले.

बळीरामपूर येथे राजरत्न नरवाडे व सचिन भदरगे या दोन मित्रांना जुन्या कारणावरून १४ एप्रिल रोजी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास धनेगाव येथे आरोपी दिलीप वाघोजी गजभारे, सुबोध उर्फ टिंकू गजभारे, राजू माणिक गजभारे, अभिजीत गजभारे, कुंदन लांडगे यांनी खंजरने जबर मारहाण केली. दोन्ही जखमींना नांदेडच्या विष्णुपुरी रुग्णालयात दाखल केले असून एकाची प्रकृती गंभीर आहे. राजरत्न नरवाडे यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. यातील राजू गजभारे, अभिजीत गजभारे आणि कुंदन लांडगे यांना अटक केली असून दिलीप गजभारे आणि सुबोध गजभारे हे दोघेजण फरार असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रेखा काळे करत आहेत.

## भगवान परशुराम जयंती मोठ्या उत्साहात साजरी करणार –निखिल लातूरकर

**नांदेड (प्रतिनिधी)**– दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भगवान परशुराम यांची जयंती मंगळवारी (दि. २९ एप्रिल) मोठ्या उत्साहात, धार्मिक आणि हर्षोल्हासात साजरी करण्यात येणार आहे, अशी माहिती अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी दिली.

सकाळी ८ वाजता भजन, नऊ वाजता भगवान परशुराम यांच्या नामपलकाचे पूजन करण्यात येणार आहे. सर्व हिंदुत्ववादी जनतेने सकाळी नऊ ते बारा या वेळेत महाप्रसादास उपस्थित राहावे, असे आवाहन निखिल लातूरकर यांनी केले आहे. उपवास असणाऱ्यांसाठी महाप्रसादात फराळाची व्यवस्था करण्यात आली आहे. भगवान परशुराम चौकासाठी जिल्हा प्रशासनाने सहकार्य केले त्याबद्दल निखिल लातूरकर यांनी मनपा, पोलीस आणि जिल्हा प्रशासनाचे आभार मानले आहेत. तसेच या कार्यात प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य केलेल्यांचे त्यांनी आभार मानले आहेत.



या निमित्ताने ब्राह्मण समाजाची मोठी लढाई सर्वांच्या सहकार्याने जिंकली याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. यापुढे आम्ही सकाळी फक्त आठ वाजता नामफलकाचे पूजन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रस्ता अडवून आम्हाला जनतेची गैरसोय करायची नाही. आषाढी महोत्सवाप्रमाणे भगवान परशुराम उत्सव कुसुम सभागृह येथे लवकरच करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी कोणतीही पत्रिका अथवा पावती पुस्तक छापलेले नाही. त्यामुळे देणगी मागण्यास कोणीही येणार नाही याची नोंद घ्यावी, असेही निखिल लातूरकर यांनी नमूद केले आहे. सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी उपरोक्त वेळेत उपस्थित राहून सहकार्य करावे, असेही लातूरकर यांनी म्हटले आहे.

भगवान परशुराम यांचा पुतळा उभारण्यासाठी सर्व पक्षातील लोकप्रतिनिधींनी सहकार्य करावे, असे आवाहन अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी केले आहे.

## किनवट येथे सामूहिक उपनयन संस्कार सोहळा

**किनवट (प्रतिनिधी)**– अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ किनवटच्यावतीने दि. २ मे रोजी श्री. गजानन महाराज मंदिर सभागृहात तिसऱ्या सामूहिक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

किनवट ब्राह्मण महासंघाच्यावतीने सामूहिक उपनयन संस्कार हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यंदाचा सोहळा दि.२ मे रोजी सकाळी १०.३१ वाजता होणार आहे. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. यंदाच्या मेळाव्यासाठी आतापर्यंत ९ बटुंची नोंदणी झाली आहे.

इच्छूक बटुंच्या पालकांनी दि. ३० एप्रिलपर्यंत ९४०४७३८७३६ व ९७६३० ४८५६६ या क्रमांकावर नाव नोंदणी करावी, असे आवाहन ब्राह्मोण महासंघ व मौंज मेळावा समितीने केले आहे.

## रूक्मीणबाई डक पाटील यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– तालुक्यातील पिंपळगाव (नि.) येथील ज्येष्ठ महिला रुक्मीणबाई विठ्ठलराव पाटील डक (वय ८५) यांचे दि. २१ रोजी पहाटे ४ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर सायंकाळी ४ वाजता पिंपळगाव (नि.) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. बाजार समितीचे उपसभापती तथा शिवसेना जिल्हाप्रमुख भुजंगराव पाटील डक यांच्या त्या मातोश्री होत.

## सुरेश भुसावळे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– आदमपूर (ता. बिलोली) येथील नागरिक सुरेश संभाजी भुसावळे (वय ५६) यांचे दि.२० रोजी रात्री १० वाजता हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, सुना, दोन भाऊ, भावजयी, नात-नातू असा परिवार आहे. रामतीर्थ येथील मधुकरराव पाटील खतगावकर महाविद्यालयाचे कर्मचारी नारायण भुसावळे व देविदास भुसावळे यांचे बंधू तर संदीप भुसावळे यांचे वडील होत.

## स्ट्रीट सेफ्टी पथकाने तीन खंजर केल्या जप्त; तिघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**–शहरांमध्ये काहीजण शस्त्र बाळगून परिसरात दहशत पसरत असल्याच्या तक्रारी पोलीस अधीक्षक कार्यालयात प्राप्त झाल्या होत्या. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत शहरात वेगवेगळ्या ठाण्याच्या हद्दीत कारवाया करून तिघांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून तीन खंजर जप्त करण्यात आल्या आहेत.

शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांनी तेहरानगर, नुरी इलाही मशीदसमोर कारवाई करून अमोल राजू खंदारे (वय २०) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक खंजर जप्त करण्यात आला. फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासोबतच भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस उपनिरीक्षक हनुमंत शिंदे यांनी अंगदसिंग सुरजतसिंग घुमन (वय अठरा वर्षे) रा. शहीदपुरा गुरुद्वारा गेट नंबर (चार) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक खंजर जप्त केला आहे. हनुमंत शिंदे यांच्या फिर्यादीवरून अंगतसिंग घुमान विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच याच ठाण्याच्या हद्दीत गीताई हॉस्पिटलसमोर गुरुप्रसाद रामप्रसाद वडजे (वय १९) आणि जसराजसिंग गोविंदसिंग पुजारी दोघे राहणार नंदीग्राम सोसायटी नांदेड यांच्याकडून खंजर आणि एक दुचाकी (एमएच २६-सीएस- ०१४८) जप्त केली.

पोलीस हवालदार प्रदीप गर्दनमारे यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात वरील दोघांविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सय्यद करत आहेत.

पान १ वरून...

### प्रा. डॉ. दीपक शिंदे...

नांदेड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आहे. उत्कृष्ट पत्रकारिते बद्दल दर्पण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

डॉ. दीपक शिंदे हे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या नेट परीक्षेसाठी एनटीए कडून नेमले गेलेले देशाचे समन्वयक आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परीक्षेत्रातील सेट परीक्षेचे समन्वयक म्हणून त्यांनी उत्तम काम केले आहे.

विविध लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पद्धतीच्या कार्यात पत्रकारिता विषयाच्या कामात ते प्रमुख सहभागी आहेत. नॅक बेंगलोर यांच्या वतीने पाठविण्यात येणाऱ्या समितीचे अनेक ठिकाणी अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आहे. देशभरातील सुमारे ४० विद्यापीठात परीक्षेच्या कामात त्यांचा सक्रिय सहभाग आहे. पंजाब, दिल्ली, हरियाणा, प. बंगाल राज्यातील व महाराष्ट्रातील बहुतांश विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर सदस्य तर नांदेड व गडचिरोली विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून डॉ. शिंदे यांनी काम केले आहे.

केंद्रीय विद्यापीठात परीक्षा नियंत्रक म्हणून त्यांच्या झालेल्या निवडीबद्दल आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ. हेमंत पाटील, आ. राजेश पवार, आ. विक्रम काळे, आ. रामराव पवार पाटील, माजी मंत्री कमलकिशोर कदम, माजी मंत्री डी. पी. सावंत, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, माजी कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर, डॉ. सुधीर गव्हाणे, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्र चव्हाण, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, संचालक बी.बी. सुरवसे, प्राचार्य डॉ. वसंत भोसले, प्राचार्य गणेश्चंद्र शिंदे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## विहिरीत पडून महिलेचा मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)**– दुपारी दोनच्या सुमारास बाचोटी शिवारात गाईला पाणी पाजण्यासाठी गेलेल्या महिलेचा विहिरीत पडून मृत्यू झाला. ही घटना २० एप्रिल रोजी घडली.

बाचोटी शिवारात अनुसयाबाई बालाजी पांडुरंग (वय ५०) ह्या पाणी पाजण्यासाठी गाईला घेऊन विहिरीवर गेल्या होत्या. विहिरीतून पाणी काढत असताना त्यांचा पाय घसरून विहिरीत पडल्या. त्यांना पोहता येत नसल्याने पाण्यात बुडून मरण पावल्या. शंकर पांडुरणे यांनी दिलेल्या माहितीवरून कंधार ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. उत्तरीय तपासणी आणि कायदेशीर सोपस्कार करून सदर महिलेचा मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार सानप करत आहेत.

## मनपाच्या वजिराबाद येथील शाळेत विद्यार्थिनींना सायकलचे मोफत वाटप

**नांदेड (प्रतिनिधी)**– पीएम श्री नांदेड महानगरपालिकेच्या वजिराबाद येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थीनींना मनपाच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने सोमवारी (दि.२१) मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. मनपा आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपालसिंग संधू, शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली २०२४-२५ मध्ये इयत्ता सहावीतील ३३ विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमात नांदेड मनपाचे शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांनी विद्यार्थी व पालकांना प्रोत्साहन पर मार्गदर्शन केले. यामध्ये विद्यार्थिनींना महानगरपालिका नांदेड तर्फे सायकल देण्याचा उद्देश काय आहे, यांची सविस्तर माहिती पालकांना सांगितली. कोणतीही मुलगी ही शाळा दूर आहे म्हणून शिक्षणापासून वंचित राहू नये असेही शिक्षणाधिकाऱ्यांनी आपल्या मार्गदर्शनात नमूद केले. तसेच मुलींनी आपल्या पालकांना सांगितले पाहिजे की माझे शिक्षण होईपर्यंत माझे लग्न करू नका. आई-बाबांनी असा निश्चय घेण्याचाही शिक्षणाधिकाऱ्यांनी विद्यार्थिनींना कानमंत्र दिला. तसेच विद्यार्थिनींनी कसा अभ्यास करावा व आपले कसे भविष्य घडवावे याबद्दलही अनमोल मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक परमेश्वर माहुरे व शिक्षक वृंदांचे यावेळी चौधरी यांनी कौतूक केले.

यावेळी सायकल मिळणाऱ्या विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंद हा ओसंडून वाहत होता. या कार्यक्रमासाठी शिक्षण विभागाचे समग्र शिक्षा अभियानचे समन्वयक ढवळे व विषय तज्ज्ञ लबडे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष प्रकाश गजभारे यांच्यासह अनेक पालक उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी मुख्याध्यापक परमेश्वर माहुरे व सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### नांदासौख्यभरे

**पवार–कवळे**

सौ. अनिताताई व माधवराव पवार पाटील रा. जवळगाव ता. हिमायतनगर जि. नांदेड यांची सुकन्या कै. निवृत्तीराव पवार पाटील जवळगावकर यांची नात चि. सौ.कां. नेहा हिचा साक्षगंध सोहळा सौ. सागरबाई व मारोतराव कवळे पाटील रा. सिंधी ता. उमरी जि. नांदेड यांचे सुपूत्र व कै. व्यंकटराव कवळे पाटील यांचे नातू चि. संदिप यांचे समवेत आज मंगळवार, दि. २२ एप्रिल, २०२५ रोजी दुपारी १२.११ वाजता जवळगाव ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे सानंद संपन्न होत आहे. वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

–मुख्यसंपादक

### नांदासौख्यभरे

**भोसले–देशमुख**

सौ. छाया व माणिकराव भोसले रा. कांडली, ता. भोकर जि. नांदेड ह.मु. नांदेड यांची सुकन्या कै. सावित्रीबाई बापुराव भोसले यांनी नात चि. सौ.कां. अनुजा हिचा शुभ विवाह सौ. साधना व सतीश देशमुख तरोडेकर यांचे कनिष्ठ चिरंजीव सौ. पद्मीनबाई व पुंडलिकराव देशमुख यांचे नातू रा. नांदेड चिरंजीव शिवम यांचे समवेत आज मंगळवार, दि. २२ एप्रिल, २०२५ रोजी सायंकाळी ०६.४६ वाजता भक्ती लॉन्स मालेगाव रोड, नांदेड येथे सानंद संपन्न होत आहे. वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

–मुख्यसंपादक

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com